

रंगनाथ पठारे
यांचे भाषण

साप्ताहिक
# साधना
संस्थापक
साने गुरुजी
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१८ नोव्हेंबर २०१७
मूल्य रु.१५
(एकूण पृष्ठे : ३६)



## शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नाचं मृगजळ : (अर्थात बिरबलाची खिचडी)

रमेश जाधव





Date of Publication - 09-11-2017

। २ । साधना । १८ नोव्हेंबर २०१७ ।
Date of Publication - 9-11-2017

Date of issue
१८ नोव्हेंबर २०१७
वर्ष ७० / अंक : १४

संपादक :
विनोद शिरसाठ

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

अंकनिर्मिती, व्यवस्थापक व अक्षररचना :
**सुरेश माने**

मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून,
**साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
Web.weeklysadhana.com
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ७०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १४०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २१०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, खाते क्र. 60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून.)

## अनुक्रम

४. **मूक प्रतिसाद**
संपादकीय

५. **ज्यू आणि अरब यांच्यातील वाद**
रामचंद्र गुहा

८. **शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नाचं मृगजळ**
रमेश जाधव

२४. **विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषण**
रंगनाथ पठारे

३३. **प्रतिसाद**
भ. पां. पाटणकर




Date of Publication - 9-11-2017

स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां ।
करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना ।।

**संपादकीय**

# मूक प्रतिसाद

बालकुमार, युवा व मुख्य असे तीन दिवाळी अंक आणि त्यानंतर तीन आठवडे वार्षिक सुट्टी असल्याने, दीड महिन्यानंतर वाचकांच्या भेटीला हा नियमित अंक येत आहे. साधनाचे नवे वर्षही खऱ्या अर्थाने दिवाळीनंतरच सुरू होत असते. नवे विषय, नवे लेखन, नवे लेखक पुढे करण्याची प्रक्रियाही दिवाळीनंतरच सुरू होत असते. त्याप्रमाणे ती पुढील आठवड्यापासून क्रमाक्रमाने पुढे जाईल. हा अंक मात्र मुख्य दिवाळी अंकाची पुरवणी म्हणता येईल असाच झाला आहे.

या अंकातील रमेश जाधव व रंगनाथ पठारे यांचे दीर्घ लेख, जरा काळजीपूर्वक वाचावे लागणार आहेत. वातावरणात सर्वत्र भरून राहिलेल्या अस्वस्थतेत अधिक भर घालण्याचे काम या लेखांमधून होणार आहे; परंतु या अस्वस्थतेतून वाट काढली पाहिजे अशी जाणीव होण्यासाठीही हे लेख उपयुक्त ठरणार आहेत.

शेतीविषयी खूप काही बोलले-लिहिले जाते, परंतु त्यातील बहुतांश लेखनात तुकड्या-तुकड्यांत विचार केलेला आढळतो. आणि प्रत्यक्षातील वस्तुस्थिती नजरेआड करून विचार केल्यामुळे व तशीच मांडणी केल्यामुळे समस्येचे आकलनही नीट होत नाही. या पार्श्वभूमीवर रमेश जाधव यांचा लेख समग्र विचार करून सम्यक मांडणी करणारा व गुंतागुंत उलगडून दाखवणारा आहे.

साहित्य क्षेत्र मागील तीन-चार वर्षे अस्वस्थता अधिक अनुभवत आहे. राष्ट्रीय स्तरावर ती अस्वस्थता जेवढ्या ढळकपणे व्यक्त झाली, तेवढ्या तीव्रतेने मराठी साहित्यक्षेत्रात घडले नाही. या पार्श्वभूमीवर रंगनाथ पठारे यांचे अहमदनगर येथील साहित्य संमेलनातील भाषण महत्त्वाचे आहे. विशाल सांस्कृतिक पट दाखवतानाच, वर्तमान अवकाश कसा संकुचित होत आहे; अशा दिशेने जाणारे विवेचन त्यांनी केले आहे.

रामचंद्र गुहा यांनी ज्यू व अरब आणि इस्राईल व पॅलेस्टाइन यांच्या संघर्षाकडे लक्ष वेधले आहे. मागील शंभर वर्षांत तो संघर्ष कसा आकाराला आला आणि आता कोणत्या टप्प्यावर आहे, याचे काही कवडसे त्यांनी दाखवले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, त्यात एका शब्दानेही उल्लेख केलेला नसला तरी तो लेख वाचताना सुरुवातीपासून शेवटपर्यंत भारत व पाकिस्तान आणि हिंदू व मुस्लिम यांचा संघर्ष नजरेसमोर येत राहतो. म्हणजे या प्रश्नाची किंवा समस्येची मुळे किती खोलवर व किती गतकाळात दडलेली आहेत, हे तीव्रतेने जाणवते आणि मग या क्षेत्रात किती सातत्याने व धैर्याने काम करणे गरजेचे आहे, हे अधोरेखित होते.

या तीन लेखांच्या बरोबरीनेच भ.पां.पाटणकर यांचा टीपणवजा लेखही काही अलक्षित मुद्यांकडे लक्ष वेधणारा आहे.

हा अंक वाचकांच्या हातात पडलेला असेल तेव्हा 'नोटबंदी' नावाच्या तुघलकी निर्णयाला एक वर्ष पूर्ण झालेले असेल. सरकारच्या वतीने त्या निर्णयाचे अंध व आक्रमक समर्थन चालू असेल, परंतु विरोधकांकडून 'काळा दिवस' साजरा करण्याच्या निर्णयाला जनतेचा मूक प्रतिसाद बराच जास्त मिळालेला असेल.


Date of Publication - 9-11-2017

कालपरवा

रामचंद्र गुहा

# ज्यू आणि अरब यांच्यातील वाद

एके काळी इस्रायली विरुद्ध पॅलेस्टिनी यांच्यातील संघर्ष हा 'दोन्ही बाजू बरोबर' असलेला संघर्ष होता. आता त्या संघर्षाचे वर्णन हे 'दोन्ही बाजू चुकीच्या' असलेला संघर्ष असे केले जाते. दोन्ही बाजूंनी त्यांच्या राष्ट्रीय आणि धार्मिक उद्दिष्टांसाठी बंदुका व बॉम्ब यांचा वापर करून भरपूर हिंसा केली आहे. जमशेटजी टाटा यांना १८७३ मध्ये दिसलेला धार्मिक कैफ/धुंदी आता अधिकच ठळक, कडवी आणि धोकादायक झाली आहे. त्याच वेळेस, दोन्ही बाजूंपैकी जास्त सामर्थ्यवान आणि जास्त लष्करी बळ असलेल्या इस्रायलकडे दोषाचा अधिक वाटा जातो.

जमशेटजी टाटा यांनी १८७३ मध्ये जेरुसलेम शहराला भेट दिली होती. त्या शहरात सर्वत्र दिसत असलेला धार्मिक कर्मठपणा पाहून त्यांना धक्काच बसला होता. त्या भेटीदरम्यान त्यांना असा प्रश्न पडला की– 'काही देश आणि माणसे आपण साऱ्या जगापेक्षा श्रेष्ठ आहोत, असे मानत असतात; जेरुसलेम शहरात धर्माच्या नावाने केल्या जाणाऱ्या विचित्र गोष्टींवर पूर्णपणे किंवा काहीअंशी तरी विश्वास बसावा इतके ते दांभिक अथवा आपल्याच (धार्मिक) धुंदीत बुडालेले असू शकतात का? असे शक्य आहे काय?' शहरातील लोकांशी बोलताना त्या लोकांचा मूर्खपणा, पक्षपातीपणा आणि ढोंगीपणा पाहून टाटा आश्चर्यचकित झाले होते. विचारलेल्या प्रश्नांकडे लक्ष देणे हा मानवी सभ्यतेचा किमान संकेत मानला जातो. जेरुसलेममधील लोक तोदेखील पाळत नव्हते. टाटांच्या असे लक्षात आले की– मुस्लिम लोकांची श्रद्धास्थाने व तेथील चमत्कार याविषयी त्यांचा ख्रिश्चन धर्मीय वाटाड्या ज्या खोचकपणे आणि विश्वास बसणार नाही अशा पद्धतीने बोलत होता, ते फारच इंटरेस्टिंग होते. असाच प्रकार तेथील मुस्लिम वाटाडे ख्रिश्चन धर्मीयांच्या बाबतदेखील करत होते.

जमशेटजी टाटा गेले होते त्या काळात जेरुसलेममधील दांभिकपणा आणि आपल्याला अतर्क्य वाटतील अशा गोष्टींची चर्चा फक्त मुस्लिम व ख्रिश्चन यांच्यातच होत असे. पण या समीकरणात पुढील काही काळातच ज्यूधर्मीय लोकांचा तिसरा पक्ष तयार झाला. ज्यूंनी कित्येक शतकांपूर्वी त्यांची मातृभूमी असलेले पॅलेस्टाईन सोडले होते. मात्र एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काळात त्यांनी (जगाच्या इतर प्रदेशांतून) मोठ्या संख्येने पुन्हा पॅलेस्टाईनमध्ये स्थलांतर करायला सुरुवात केली. हे राष्ट्रवादाचे युग होते. युरोपातील प्रत्येक वांशिक आणि भाषिक गटाला आपले स्वतःचे राष्ट्र स्थापन करायचे होते. ज्यूंनादेखील या विचारांचे वारे लागले. परंतु पोलिश, झेक, रुमानियन किंवा माग्यार यांच्याप्रमाणे स्वतःची म्हणावी अशी कोणतीही भूमी ज्यूंकडे नव्हती; तसेच त्यांचा युरोपात सर्वत्र छळ झाला होता. त्यामुळे ज्यूंनी असे ठरवले की, आपला देश नव्याने पॅलेस्टाईनमध्ये तयार करू या.

थिओडोर हर्झेल हे एकोणिसाव्या शतकातील प्रमुख विचारवंतांपैकी एक होते. ज्यूंच्या या मागणीमागे हर्झेल यांची प्रेरणा होती. हर्झेल आणि त्यांच्यासारख्या इतर ज्यूंचे असे मत होते की, पॅलेस्टाईनमध्ये स्थलांतरित झालेले ज्यू लोक तिथे आधीपासून राहणाऱ्या अरबांमध्ये सुधारणा घडवून आणतील, त्यांना शिक्षण देतील. पॅलेस्टाईनमध्ये जाऊन सुधारणा घडवून आणणे हे ज्यूंचे काम आहे, असे त्यांना वाटत होते. एशर गिन्झबर्ग हा ज्यू-रशियन विचारवंत मात्र या मताशी सहमत नव्हता. गिन्झबर्गचा जन्म आणि सगळे आयुष्य झारच्या अमलाखालील रशियात गेले. 'आहाद हाम' या टोपणनावाने तो लिहीत असे. त्याने १८९१ मध्ये एका लेखात असे लिहिले, 'स्थलांतर करणाऱ्या ज्यूंनी आधीच पॅलेस्टाईनमध्ये राहत असलेल्या लोकांची संस्कृती आणि त्यांचे हक्क यांच्याविषयी


Date of Publication - 9-11-2017

संवेदनशीलता दाखवायला हवी. मैत्री आणि आदराच्या भावनेने त्यांच्याशी वागायला हवे.' मात्र त्यांना तसे होताना दिसत नव्हते. 'आपले लोक तिथे जाऊन काय करतात? ते याच्या एकदम उलट पद्धतीने वागतात. रशिया आणि पूर्व युरोपात ते गुलामीत होते. पॅलेस्टाईनमध्ये आल्यामुळे ते अचानकपणे स्वतंत्र झाले आहेत. मात्र, या बदलानंतर ते आता हुकूमशाही वृत्तीकडे झुकले आहेत. ते अरबांना शत्रू मानतात आणि क्रौर्याने वागवतात. त्यांना त्यांचे हक्क देत नाहीत. काही कारण नसताना त्यांची कुरापत काढतात आणि ही कृत्ये ते अभिमानाने मिरवतात. आपल्यातील कोणीही त्यांच्या अशा या तिरस्करणीय आणि धोकादायक वर्तनाला विरोध करत नाही.' आहाद हाम यांनी असे एका लेखात लिहिले होते.

(पॅलेस्टाईनमध्ये जाऊन आपला देश स्थापन करायला हवा, या भावनेने ज्यूंमध्ये चांगलेच मूळ धरले होते. अशा स्थलांतरित ज्यूंनी तेथील लोकांना कसे वागवायला हवे याच्याशी) आपला मतभेद नोंदवणाऱ्या गिन्झबर्गसारख्या लोकांचा ज्यूंवर प्रभाव पडला नाही. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला युरोपातून पॅलेस्टाईनकडे जाणाऱ्या ज्यूंची संख्या वाढली होती. या स्थलांतराच्या प्रक्रियेला बाल्फोर जाहीरनाम्यामुळे आणखी गती मिळाली. या वर्षीच्या २ नोव्हेंबरला या जाहीरनाम्याला शंभरावे वर्ष पूर्ण झाले. ब्रिटिश परराष्ट्रमंत्री आर्थर जेम्स बाल्फोर यांनी २ नोव्हेंबर १९१७ ला असे जाहीर केले की, पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची 'मातृभूमी' स्थापन करायला ब्रिटिश सरकारचा पाठिंबा असेल. ही घोषणा केली, तेव्हा पहिले महायुद्ध संपत आले होते. महायुद्धात ब्रिटन विजयी होण्याच्या मार्गावर होते. पॅलेस्टाईन तेव्हा ओटोमान साम्राज्याच्या नियंत्रणात होते आणि ओटोमान साम्राज्य महायुद्धात पराभूत झाले होते. विजय मिळवल्यानंतर केलेल्या करारात ब्रिटिशांनी पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे राज्य स्थापन करायची मनीषा व्यक्त केली होती.

बाल्फोर जाहीरनाम्यामुळे ज्यूंच्या स्थलांतराला १९२० च्या दशकात वेग प्राप्त झाला. पुढे १९३० च्या दशकात हिटलर आणि नाझीवादाच्या उदयामुळे त्या स्थलांतराची गती आणखीन वाढली. महात्मा गांधीजींना १९३८ साली 'ज्यूंच्या पॅलेस्टाईनमध्ये राज्य स्थापन करण्याच्या इच्छेविषयी काय वाटते?' असे एका पत्रकाराने विचारले. गांधीजींनी उत्तर दिले होते, त्यांना सर्व ज्यूंविषयी सहानुभूती वाटते. जसे हिंदू धर्मात अस्पृश्य आहेत तशी अवस्था ज्यूंची ख्रिश्चन धर्मात आहे. दोन्हीकडे अमानुष वागणुकीचे समर्थन करण्यासाठी धर्माचा आधार घेतला जातो.'

मात्र, अशी सहानुभूती असूनदेखील गांधीजींचे पॅलेस्टाईनमध्ये आधीच राहत असलेल्या लोकांच्या न्याय्य गरजांकडे दुर्लक्ष झाले नव्हते. जर ज्यूंना त्यांचे राज्य हवे असेल, तर त्याची किंमत अरबांनी का द्यावी बरे? 'युरोपातील ज्यू पॅलेस्टाईनमध्ये ब्रिटिश बंदुकीच्या छायेत' स्थलांतर करीत आहेत याचे त्यांना वाईट वाटले होते. ते म्हणाले, ''एखादी धार्मिक कृती करायची असेल, तर ती बंदूक किंवा बॉम्ब यांच्या मदतीने केली जाऊ शकत नाही. जर ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये राहायला यायचे असेल, तर त्यांनी अरबांच्या सदिच्छेने यावे.'' मात्र तत्कालीन परिस्थिती अशी होती की, ज्यू हे ब्रिटिशांच्या बरोबरीने अरबांचे हक्क हिरावून घेत आहेत. या अरबांनी ज्यूंचे काहीही वाईट केलेले नाही.

त्यांच्या या सल्ल्याकडे आणि इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले गेले. पॅलेस्टाईनमध्ये ज्यू आणि अरब एकमेकांशी भांडत राहिले. पुढे १९४८ मध्ये इस्रायलची स्थापना झाल्यावर तर हा संघर्ष आणखीच तीव्र बनला. ज्यू आणि अरब यांच्यात १९४८, १९५६, १९६७ आणि १९७३ मध्ये मोठी युद्धे झाली. ही चार युद्धे होऊनदेखील त्यांच्यातील संघर्ष कमी झालेला नाही.

थोर इतिहासकार हॅन्स कोहन यांनी १९५६ च्या युद्धानंतर अरबांशी शांततेचे संबंध प्रस्थापित व्हावेत यासाठी प्रयत्न केलेल्या धाडसी ज्यूंवर लेख लिहिला. 'रेब बिन्योमीन' या टोपणनावाने लिहिणाऱ्या एका अभ्यासकाचा त्यांनी आपल्या लेखात उल्लेख केला. या बिन्योमीन यांनी १९५३ मध्ये इतर कर्मठ ज्यू लोकांपेक्षा वेगळी भूमिका घेणाऱ्या लोकांची लक्षणे सांगितली होती, ती खालीलप्रमाणे– 'समाजातील इतर लोकांपेक्षा आपण कसे वेगळे ठरतो? आपला अरब लोकांविषयी असलेला दृष्टिकोन हे वेगळेपणाचे प्रमुख लक्षण आहे. ते अरबांना शत्रू मानतात. त्यांच्यापैकी काही जण मनमोकळेपणे हे सांगतात की, ते अरबांना कायमचे शत्रू मानतात. त्यांच्यापैकी जे जरा हातचे राखून बोलतात, ते शांततेची भाषा वापरतात; परंतु त्याप्रमाणे ते कृती करत नाहीत. त्यांना अरबांच्या शरणागतीमधून येणारी शांतता हवी आहे. अरबांना हे कधीही मान्य होणार नाही, इतकी टोकाची आणि ताठर भूमिका ज्यूंमधील कर्मठांची होती. मात्र स्वतःविषयी आणि त्यांच्यासारख्याच इतर धाडसी लोकांविषयी बोलताना रेब

बिन्योमीन यांनी असे लिहिले होते की, 'आम्ही अरबांना वर्तमानकाळ किंवा भूतकाळ या दृष्टीने कधीही शत्रू मानत नाही.'

हॅन्स कोहन हे जन्माने ज्यू असले, तरी ते इस्रायलमध्ये राहत नसत. जेकब टालमन हे प्रभावी इतिहासकार मात्र इस्रायलमध्येच राहत असत. टालमन यांनी १९६७ च्या युद्धानंतर 'एन्काऊंटर' नावाच्या मासिकात 'द अर्ग्युमेंट बिट्वीन ज्यूज अँड अरब्स' या शीर्षकाचा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी लिहिले होते, 'ज्यूंच्या (पॅलेस्टाईनवरील) दाव्याला अरबांनी कायम खोडूनच काढले आहे. (असे करण्यामागे) ज्यूंच्या जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी केलेल्या कृतींचा यात बराच वाटा आहे.' जेरुसलेमच्या पवित्र आणि वादग्रस्त मानल्या गेलेल्या भूमीवरील ज्यूंचा हक्क अरबांना मान्य नव्हता, त्याचप्रमाणे त्या भूमीवरील अरबांचा हक्क ज्यूंनादेखील अमान्य होता. त्यामुळे टालमन यांनी असे लिहिले होते की, 'जेरुसलेमवर आपला ताबा टिकवून ठेवावा या मुद्द्यावर इस्रायलमधील जनभावना इतकी तीव्र आहे की, या मुद्द्यावर दुबळेपणा दाखवणाऱ्या सरकारला एक आठवडादेखील सत्तेत राहता येणार नाही.'

वेस्ट बँक, गाझा आणि पूर्ण जेरुसलेम शहर या प्रदेशांचा ताबा १९६७ च्या युद्धातील विजयानंतर इस्रायलकडे गेला. या मानहानीमुळे अरबांना वस्तुस्थितीची जाणीव झाली आणि 'ज्यूंचे हक्क साफ अमान्य करण्याची भूमिका' त्यांनी सोडून दिली. त्यामुळे पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन आणि इस्राईल सरकार यांच्यात शांततेसाठी चर्चा सुरू झाली. (नॉर्वेची राजधानी) ओस्लोमध्ये १९९३ मध्ये 'टू स्टेट सोल्युशन (पॅलेस्टाईनच्या भूमीमध्ये दोन देश तयार केले जावेत)'ला अधिकृतरीत्या मान्यता मिळाली. पॅलेस्टाईनने इस्रायलच्या अस्तित्वाला मान्यता दिली, तर त्या बदल्यात वेस्ट बँक आणि गाझा या प्रदेशात त्यांचा स्वतःच देश स्थापन करण्याची त्यांची इच्छा होती.

शंभर वर्षांपूर्वी ज्यूंना त्यांची मातृभूमी स्थापन करता यावी यासाठी बाल्फोर जाहीरनाम्याने हमी दिली. पन्नास वर्षांपूर्वी झालेल्या १९६७ मधील युद्धानंतर इस्राईल स्वतःच एक वसाहतवादी सत्ता बनली. या वर्षी बाल्फोर जाहीरनाम्याला शंभर वर्षे आणि १९६७ च्या युद्धाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. पुढील वर्षी पॅलेस्टाईनचे राज्य निर्माण करायला मान्यता देणाऱ्या ओस्लो कराराला पंचवीस वर्षे पूर्ण होतील. मात्र, गेल्या शतकभरात ज्यू आणि अरब यांच्यातील संघर्ष जितका तीव्र होता तितकाच तो आतासुद्धा तीव्र आहे.

दोन्ही बाजूंच्या भूमिका आता जास्त ताठर झाल्या आहेत. टालमन यांनी १९६७ मध्ये लिहिले होते, 'मनात गौरवशाली भूतकाळाच्या स्मृती असणारा व ज्याचा अहंकार जखमी झाला आहे असा वंश अस्तित्वात असणे, ही काही लाजिरवाणी गोष्ट नाही. मात्र आपण जखमी झाल्याची भावना सतत वागवणे आणि (त्यामुळे) स्वतःविषयीच करुणा वाटणे, यामुळे आत्मकेंद्रितपणा आणि माणूसघाणेपणा यांना पूरक वातावरण तयार होते.' दुर्दैवाची गोष्ट अशी की, 'आपण इतरांनी केलेल्या अन्यायाला बळी पडलेलो आहोत' ही टालमन यांनी जाणीव करून दिलेली भावना ज्यू आणि पॅलेस्टिनी लोक अशा दोघांनाही आता लागू होते. दोन्ही समाजांना आपला दूरचा भूतकाळ गौरवास्पद आहे आणि दोघांनाही नजीकच्या भूतकाळात व वर्तमानकाळात आपल्यावर अन्याय झाला आहे, असे वाटते. ज्यू हे खऱ्या किंवा काल्पनिक अत्याचारांमुळे पॅलेस्टिनी लोकांनी प्रत्यक्षात भोगलेल्या किंवा त्यांच्यावरील काल्पनिक अत्याचारांबाबत असंवेदनशील बनतात. पॅलेस्टिनी लोक ज्यूंबाबतसुद्धा असेच असंवेदनशील बनले आहेत. दोन्ही बाजूंनी धार्मिक मूलतत्त्ववाद वाढल्यामुळे सलोखा प्रस्थापित करणे जास्त कठीण बनले आहे.

एके काळी इस्रायली विरुद्ध पॅलेस्टिनी यांच्यातील संघर्ष हा 'दोन्ही बाजू बरोबर' असलेला संघर्ष होता. आता त्या संघर्षाचे वर्णन हे 'दोन्ही बाजू चुकीच्या' असलेला संघर्ष असे केले जाते. दोन्ही बाजूंनी त्यांच्या राष्ट्रीय आणि धार्मिक उद्दिष्टांसाठी बंदुका व बॉम्ब यांचा वापर करून भरपूर हिंसा केली आहे. जमशेटजी टाटा यांना १८७३ मध्ये दिसलेला धार्मिक कैफ/धुंदी आता अधिकच ठळक, कडवी आणि धोकादायक झाली आहे. त्याच वेळेस, दोन्ही बाजूंपैकी जास्त सामर्थ्यवान आणि जास्त लष्करी बळ असलेल्या इस्रायलकडे दोषाचा अधिक वाटा जातो. सध्याचे इस्रायली पंतप्रधान बेन्जामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखाली अधिकाधिक इस्रायली लोक अरबांना शत्रू मानू लागले आहेत. ही शत्रुत्वाची भावना जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत या पवित्र मानल्या गेलेल्या भूमीत शांतता प्रस्थापित होणार नाही.

(अनुवाद : संकल्प गुर्जर)

**रामचंद्र गुहा**, बंगळुरू

चिकित्सा

रमेश जाधव

# शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नाचं मृगजळ

## (अर्थात बिरबलाची खिचडी)

शेतकऱ्यांचं उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करणार ही नरेंद्र मोदींची घोषणा प्रतिकात्मक आहे, असं आपण मानू. त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहू. सध्या शेतीतून मिळणारं उत्पन्न तुटपुंजं आहे. देशातील ५३ टक्के शेतकरी कुटुंबांना- ज्यांची जमीनधारणा ०.६३ हेक्टरपेक्षा कमी आहे- निव्वळ शेतीपासून मिळणारे उत्पन्न इतके कमी आहे की त्यांची गरिबीपासून सुटका होऊ शकत नाही. कोरडवाहू-अल्पभूधारक शेतकऱ्याची मिळकत सरकारी नोकरीतल्या चपराशापेक्षा कमी आहे; त्यामुळे दुसरा पर्याय मिळाला तर शेती सोडून देण्याची इच्छा असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या प्रचंड आहे. पराभव निश्चित असलेली लढाई किती दिवस लढायची, आपली दुसरी पिढी तरी या शेतीच्या खातेऱ्यात पडू नये ही सार्वत्रिक भावना आहे.

॥ १ ॥

गुजरात आणि हिमाचलमधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जाहीर सभांचा धडाका लावलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देहबोली मात्र सध्या कमालीची बदललेली दिसत आहे. बचावात्मक भूमिकेत शिरलेले आणि आत्मविश्वास हरवल्यासारखे दिसणारे मोदी काहीसे केविलवाणेही वाटत आहेत. परंतु, अवघ्या काही महिन्यांपूर्वी असं चित्र नव्हतं. जनमानसाची नाडी अचूक ओळखण्याच्या आपल्या क्षमतेबद्दल अतिआत्मविश्वास आणि उर्मटपणाकडे झुकणारा, मौखिक रसवंती व शारीर आविर्भावांचा मेळ त्यांच्यात होता. त्या जोरावर जादूगारानं हॅटमधून कबुतर काढावं तसं- चमत्कृतीपूर्ण नव-नव्या कल्पना आणि घोषवाक्यांची उधळण करण्यात त्यांचा हात कोणी धरू शकत नव्हतं. मोदींच्या या वैशिष्ट्याची साक्ष देणारा असाच एक दिवस म्हणजे २८ फेब्रुवारी २०१५. स्थळ होतं उत्तर प्रदेशातील बरेली. तिथं शेतकऱ्यांच्या सभेत बोलताना त्यांनी राणा भीमदेवी थाटात 'शेतकऱ्यांचं उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करणार' अशी चित्तवेधक घोषणा केली. आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरील चर्चेचा सगळा पटच बदलून टाकला. तेव्हापासून आजतागायत देशात या विषयावर सर्व स्तरांवर चर्चा सुरू आहे.

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अर्थसंकल्प मांडताना पंतप्रधानांच्या या 'संकल्पा'चा पुनरुच्चार केला; केंद्रीय कृषिमंत्री राधामोहनसिंह यांनी तर 'हरेक रोगावर एकच अक्सीर इलाज' या उक्तीप्रमाणे शेतीच्या संबंधातल्या कोणत्याही प्रश्नावर शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नाचा जप सुरू केला. केंद्रातील आणि राज्यातील मंत्रिगण, नोकरशहा, सत्ताधारी पक्षाचे पुढारी यांनी 'शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट होणार, सगळी इडा-पीडा टळणार' असाच जणू धोषा लावला. पाच वर्षांत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट होणार आणि खरोखरीच 'अच्छे दिन' येणार, अशी वातावरणनिर्मिती मोदीभक्तांकडून केली जाऊ लागली. आणि मग आसेतुहिमाचल भारतवर्षातील समस्त शेतकऱ्यांच्या जुनाट व्याधीवर दुप्पट उत्पन्नाच्या रूपाने रामबाण उपाय सापडला असून, मोदींसारख्या युगप्रवर्तक नेतृत्वाच्या दूरदृष्टीमुळे शेतकऱ्यांची दुर्दशा संपून देशातील शेतीला नवी दिशा मिळेल, अशी एकंदर वातावरणनिर्मिती करण्यात आली.

वास्तविक, लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात ज्या स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींच्या मुद्द्यावर प्रचाराची


Date of Publication - 9-11-2017



राळ उडवून शेतकऱ्यांच्या मतांचं विक्रमी पीक काढलं गेलं, त्याच शिफारशींना बगल देण्यासाठी मोदींनी शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं पिल्लू सोडून दिलं. ही ग्यानबाची मेख समजून घेतली, तरच मोदींच्या दिलखेचक घोषणेमागची नियत आणि शेतकऱ्यांची उपेक्षा करणारी भ्रामक नीती यांचा उलगडा होईल.

गेल्या ६०-६५ वर्षांत एक देश म्हणून शेती क्षेत्रात आपण अचाट प्रगती केली. हरितक्रांतीच्या वेळी देशाची जी लोकसंख्या होती ती आता अडीच पट झाली आहे. शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे शेतजमीन आक्रसून गेली; तरीसुद्धा अन्नधान्य उत्पादन ३.७ पट वाढले. महाकाय लोकसंख्येला पुरेल इतके अन्नधान्य पिकविण्याचा भीमपराक्रम शेतकऱ्यांनी करून दाखवला. एके काळी अमेरिकेतून आयात होणाऱ्या लाल गव्हावर पोट भरण्याची वेळ आपल्यावर ओढवली होती; आज आपण अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहोत, शिवाय देशाची गरज भागवून शेतमाल निर्यात करत आहोत. ही कामगिरी अतुलनीय आहे. देशातल्या बहाद्दर शेतकऱ्यांनी सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडत घडवून आणलेला हा चमत्कार आहे. पण त्या बदल्यात आपण शेतकऱ्यांना काय दिलं? तर दारिद्र्य, दैन्य आणि निकृष्ट जीवनमान.

कारण आपला सगळा भर शेतीचं उत्पादन वाढविण्यावर राहिला, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढविण्याकडं जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आलं. सगळी प्रगती शेतीची झाली, शेतकऱ्यांची नाही. त्यांची स्थिती खालावतच गेली. शेतकरी आत्महत्यांचा कलंक दिवसेंदिवस गडद होत गेला. (सध्या देशभरात शेतकरी आंदोलनांचा भडका उडालाय. आपण शेतकऱ्यांची उपेक्षा वर्षानुवर्षे केली, त्याचे हे परिणाम आहेत.) या पार्श्वभूमीवर शेतीऐवजी शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून धोरण आखण्यासाठी म्हणून मोठा गाजावाजा करत डॉ.एम. एस. स्वामीनाथन यांच्या


Date of Publication - 9-11-2017

अध्यक्षतेखाली २००४ मध्ये राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यातल्या काही शिफारशी मनमोहनसिंग सरकारने लागू केल्या, पण उत्पादनखर्चापेक्षा दिडपट भाव देण्याची प्रमुख शिफारस काही लागू केली नाही. (आयोगाच्या शिफारशी कितपत व्यवहार्य आहेत, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे.) शेतकऱ्यांमधला असंतोष संघटित करून मनमोहनसिंग सरकारच्या विरोधात रान उठवण्यासाठी भाजपने स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करू, असं आश्वासन दिलं. पण सत्ता हस्तगत केल्यावर मात्र मोदी सरकारने शेतकरी कळवळ्याचा बुरखा फेकून दिला आणि आपले खरे रंग दाखवायला सुरुवात केली. शेतमालाला उत्पादनखर्चावर दीडपट भाव देणे शक्य नाही, असे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल केले.

**गृहीतकच चुकीचे**

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, या घोषणेचं गृहीतकच मुळात चुकीचं आहे. देशभरातील शेतकऱ्यांचं सध्याचं उत्पन्न कसं ठरवणार, त्यांचं सरासरी उत्पन्न कसं काढणार, कोणतं वर्ष आधारभूत धरणार– हे कळीचे मुद्दे आहेत. तसेच सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचं सध्याचं उत्पन्न मुळातच तोळामासा आहे. ते दुप्पट केलं, तरी त्यात कितीशी वाढ होणार आहे? दीड लाख रुपये पगार असलेल्या व्यक्तीचा पगार दुप्पट केला, तर त्याला काही अर्थ आहे; पण ज्याचा पगारच मुळात पंधराशे रुपये आहे, तो तीन हजार केल्याने असा काय तीर मारला जाणार? दीड हजाराचं उत्पन्न दीड लाख सोडा– पंधरा हजार करण्यासाठी तरी पावलं उचलली पाहिजेत. त्याऐवजी दुप्पट म्हणजे तीन हजारांचं स्वप्न दाखवून तोंडाला पानं पुसण्याचा हा प्रकार आहे. गंमत म्हणजे, मोदींनी घोषणा केली २०१५ मध्ये. त्या वर्षी दुष्काळामुळे शेतीवर मोठं संकट कोसळलं होतं. शेतकऱ्यांचं उत्पन्न आधीच मोठ्या प्रमाणावर खालावलं होतं. ते उत्पन्न दुप्पट करणार म्हणजे आधीच्या वर्षीच्या पातळीला तरी येऊन पोहोचणार का, याचं स्पष्टीकरण मात्र मोदींनी दिलं नाही. शिवाय हे आहे लबाडाचं आवतण; प्रत्यक्षात उतरेल तेव्हा खरं. (परदेशातला काळा पैसा भारतात परत आणून प्रत्येकाच्या बँक खात्यात पंधरा लाख रुपये जमा करण्याची शुद्ध लोणकढी थाप या मंडळींनी मारली होती, तिला फार दिवस झाले नाहीत.)

आश्चर्य वाटेल, पण शेतकऱ्यांचे सध्याचे उत्पन्न नेमके किती याची अधिकृत माहिती सरकारी पातळीवर आजही उपलब्ध नाही. केंद्रीय सांख्यिकी संस्था (सीएसओ) शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे अंदाज प्रकाशित करत नाही. राष्ट्रीय लेखा सांख्यिकीमध्ये मात्र क्षेत्रनिहाय उत्पन्नाच्या अंदाजांमध्ये शेतीक्षेत्राचा समावेश आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेने (एनएसएसओ) २००२–०३ आणि २०१२–१३ मध्ये केलेल्या दोन वेगवेगळ्या देशव्यापी सर्वेक्षणांच्या आधारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे अंदाज आणि उत्पन्नाचे स्रोत यांची माहिती दिली आहे. परंतु या दोन सर्वेक्षणांसाठी शेतकरी किंवा शेतकरी कुटुंबाची व्याख्या वेगवेगळी वापरली आहे. त्यामुळे तुलनेसाठी ही आकडेवारी कुचकामी ठरते. माहितीच्या या अभावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची नेमकी स्थिती आणि त्यावर कोणकोणते घटक परिणाम करत असतात, हे समजणे अवघड होऊन बसते.

शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नाच्या विषयातली दुसरी पाचर म्हणजे, शेतकऱ्यांचं नॉमिनल (नाममात्र) उत्पन्न दुप्पट करणार की (रिअल)– वास्तविक उत्पन्न याविषयीचा संभ्रम. नॉमिनल आणि रिअल या दोन उत्पन्नांत जमीन–अस्मानाचा फरक असतो. समजा– आज माझं १०० रुपये उत्पन्न आहे, ते पाच वर्षांनी २०० रुपये झालं; तर कागदोपत्री माझं नॉमिनल उत्पन्न दुप्पट होईल. पण या पाच वर्षांत महागाई किती दराने वाढली, हे बघितलं पाहिजे ना? मला आज शेतीसाठी आणि कौटुंबिक व इतर गरजांसाठी ज्या वस्तू विकत घ्याव्या लागतात, त्यांचे दर पाच वर्षांनी चार पटीने वाढले असतील; तर मग माझं उत्पन्न कागदावर दुप्पट दिसत असलं, तरी ती प्रत्यक्षात उणे वाढ असते. कारण आज ५० रुपयांत ज्या वस्तू मिळतात, त्या पाच वर्षांनी मला २०० रुपयांना मिळणार आहेत. त्यामुळे महागाईचा दर लागू करून प्रत्यक्ष मिळणारं उत्पन्न म्हणजे रिअल इन्कम.

'एनएसएसओ'ने २०१२–१३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार शेतकरी कुटुंबाची सरासरी मिळकत वार्षिक ७७ हजार ११२ रुपये एवढी आढळली (मासिक ६४२६ रुपये.) तर, २००२–०३ च्या सर्वेक्षणात ती २५ हजार ३८० रुपये होती. (मासिक रु. २११५) या उत्पन्नाच्या आकड्यांना 'कझ्युमर प्राईस इन्डेक्स ॲग्रिकल्चर लेबर (सीपीआयएएल)' हा फॅक्टर लावला, तर रिअल इन्कम मिळतं. त्यानुसार २०१२–१३ या वर्षांचं रिअल इन्कम केवळ ३८०९६ रुपये इतकंच निघतं. म्हणजे त्या दहा


Date of Publication - 9-11-2017

वर्षांत, नॉमिनल इन्कममध्ये तिप्पट वाढ दिसत असली तरी प्रत्यक्षात रिअल इन्कममध्ये पन्नास टक्केच वाढ झाली आहे.

शेती व अर्थव्यवस्थेचा सध्याचा वेग पाहता असंही सहा वर्षांत शेतकऱ्यांचं नॉमिनल इन्कम दुप्पट होतंच. त्यामुळे २०२२ पर्यंत म्हणजे सात वर्षांत शेतकऱ्यांचं (नॉमिनल) उत्पन्न दुप्पट करू, ही घोषणाच मुळात पोकळ आहे. खरं आव्हान आहे ते शेतकऱ्यांचं रिअल उत्पन्न वाढविण्याचं. सध्याच्या गतीप्रमाणे रिअल इन्कम दुप्पट व्हायला २० वर्षे लागतील; परंतु सरकारचा मनोदय रिअल इन्कम सात वर्षांत दुप्पट करायचा असेल, तर ते खूपच महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठरेल. त्यासाठी शेती आणि संलग्न क्षेत्राचा विकास सलग पाच वर्षे १४.४ टक्के या दराने व्हायला हवा, असं कृषी मूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अशोक गुलाटी व इतर अर्थतज्ज्ञ म्हणतायत. (भारतीय शेतीच्या इतिहासात एखाद्या वर्षीसुद्धा इतका विकास दर साध्य झालेला नाही.) तर नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद यांच्या मते हा दर १०.४ टक्के असायला हवा. हा विकासदरसुद्धा स्वप्नवत् आहे. कारण देशात १९९१-९२ ते २०१३-१४ या कालावधीत विकासदर सरासरी ३.२ टक्के इतका राहिला, तर २०१६-१७ मध्ये मॉन्सून चांगला राहिल्यामुळे तो ४.१ टक्क्यांवर पोहोचला. त्या आधीच्या वर्षी तो केवळ ०.७ टक्के होता. यावरून १०.४ टक्के विकासदर गाठणे किती अशक्यप्राय आहे, हे ध्यानात येईल. तरीही मोदी दुप्पट उत्पन्नाचं घोडं पुढं दामटत आहेत, हे विशेष.

॥ २ ॥

शेतकऱ्यांचं उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करणं शक्य आहे का, या विषयावर देशातील अर्थतज्ज्ञांमध्ये दोन गट पडलेले दिसतात. एका गटाला हे उद्दिष्ट अवास्तव आणि अशक्य वाटतंय. त्यात डॉ. गुलाटी व इतर अर्थतज्ज्ञांचा समावेश होतो. सरकारचे हे स्वप्न प्रत्यक्षात येणे कसे कठीण आहे, याची साधार मांडणी त्यांनी वेळोवेळी केली आहे. दुसऱ्या गटात नीती आयोगाचे सदस्य प्रा.चंद व इतर अर्थतज्ज्ञ तसेच राष्ट्रीय जिरायती क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अशोक दलवाई यांच्यासारख्या उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश होतो. योग्य दिशेने प्रयत्न झाले, तर दुप्पट उत्पन्नाचे उद्दिष्ट साध्य करणे अशक्य नाही, असे त्यांचे मत आहे.

**सहा सूत्री कार्यक्रम**

प्रा.चंद यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे करता येईल, यासंबंधी सहा सूत्री कार्यक्रमाची मांडणी केली आहे. १. पिकांची उत्पादकता वाढविणे, २. उत्पादन खर्चात कपात, ३. पिकांची घनता वाढविणे, ४. अधिक पैसे मिळवून देणाऱ्या पिकांची लागवड, ५. शेतीवर रोजगारासाठी अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा भार कमी करणे, ६. शेतमाल पणन सुधारणा.

प्रा. चंद यांच्या मते, सिंचनाचे प्रमाण वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या उपायांमुळे देशात पिकांची उत्पादकता व एकूण उत्पादन वाढविणे शक्य आहे. त्याद्वारे पीक आणि पशुसंवर्धन या दोन्ही क्षेत्रांमध्ये मिळून सात वर्षांत उत्पन्नात २७.५ टक्के वाढ होऊ शकते. निविष्ठा व साधनसामग्रीचा कार्यक्षम व पुरेपूर वापर केला, तर उत्पादन खर्चात कपात होऊन उत्पादनात वाढ होते. त्यातून सात वर्षांत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात २६.३ टक्के वाढ होऊ शकते.

देशात तृणधान्य, कडधान्य, तेलबिया पिकांखाली ७७ टक्के क्षेत्र आहे, पण एकूण पीक उत्पादनात त्यांचा वाटा केवळ ४१ टक्के आहे. तर फळे, भाजीपाला, कापूस, मसाला पिके, ऊस या उच्च मूल्य पिकांची लागवड केवळ १९ टक्के क्षेत्रावर होत असूनही त्यांचा एकूण पीक उत्पादनात वाटा जवळपास ४१ टक्के एवढाच आहे. या पिकांची उत्पादकता तुलनेने चांगली आहे. एक हेक्टर क्षेत्र उच्च मूल्य पिकांकडे वळवले तर परताव्यात प्रति हेक्टर १,०१,६०८ रुपयापर्यंत वाढ होऊ शकते. त्यायोगे उत्पन्नात पाच टक्के वाढ सात वर्षांत होणे शक्य आहे.

सिंचनाची सुविधा नसल्यामुळे किंवा पाणी वर्षभर उपलब्ध नसल्यामुळे देशात एकापेक्षा अधिक पिके घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. परिणामी, देशातील ६० टक्क्यांहून अधिक शेतजमीन निम्म्याहून अधिक काळासाठी वापराविना पडून राहते. या परिस्थितीत सुधारणा झाली तर शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात ३.४ टक्के वाढ सात वर्षांत होऊ शकते, असा प्रा. चंद यांचा दावा आहे. पणन सुधारणा हा घटक कळीचा आहे. बाजार समित्या ऑनलाईन जोडून सामाईक बाजार तयार करण्याच्या इलेक्ट्रॉनिक नॅशनल ॲग्रिकल्चर मार्केट (ई-नाम) या संकल्पनेमुळे शेतमालाला मिळणाऱ्या बाजारभावात सुधारणा झाल्याचे आढळून आले आहे. कर्नाटकात शेतमालाच्या घाऊक भावात १ ते ४३ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तसेच ऑनलाईन ट्रेडिंग व नियमनमुक्ती या सुधारणाही महत्त्वपूर्ण आहेत, असे प्रा. चंद मानतात.

ग्रामीण भागात ६४ टक्के लोकसंख्या शेतीवर

रोजगारासाठी अवलंबून आहे. उत्पादनात त्यांचा वाटा केवळ ३९ टक्के आहे. शेतीवरला हा भार कमी केला तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. 'एनएसएसओ'च्या आकडेवारीनुसार २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीत शेती सोडून इतर क्षेत्रात रोजगार शोधणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वार्षिक २.०४ टक्के इतके राहिले. या गतीने सात वर्षांत रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ५५ टक्क्यांवर येऊ शकते. तथापी हा वेग कमी असण्याची मुख्य कारणे पुढीलप्रमाणेः अ. उत्पादन क्षेत्रात रोजगार मिळवण्यासाठी विशिष्ट कौशल्य व शिक्षणाची आवश्यकता. ब. ग्रामीण भागापासून दूरवरच्या अंतरावर औद्योगिक आस्थापनांचे जाळे. क. शेती सोडून रोजगारासाठी येणाऱ्या लोकसंख्येला सामावून घेऊ शकेल एवढी औद्योगिक क्षेत्राची क्षमता नसणे. केंद्र सरकारने कौशल्यविकासासाठी नुकताच जो कार्यक्रम जाहीर केला आहे, त्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिले तर त्यांना बिगर शेती क्षेत्रात रोजगाराच्या चांगल्या संधी मिळणे शक्य होईल, असा विश्वास प्रा. चंद यांना वाटतो.

**आधी कळस, मग पाया**

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी कोणताही कृती आराखडा हातात नसताना पंतप्रधान मोदी फेब्रुवारी २०१५ मध्ये घोषणा करून मोकळे झाले. त्यानंतर सुमारे १४ महिन्यांनी म्हणजे एप्रिल २०१६ मध्ये केंद्र सरकारने दुप्पट उत्पन्नासाठी ब्ल्यू प्रिन्ट काय असावी, हे ठरविण्यासाठी डॉ.अशोक दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली. त्यात कृषी व अन्न मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, नॅशनल कौन्सिल फॉर ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिसी रिसर्च या संस्थांतील तज्ज्ञांचा समावेश आहे. या समितीने दोन महिन्यांत अहवाल देणे अपेक्षित होते. परंतु समितीने व्यापक पट हाताळत १३ मुद्यांवर एकूण नऊ खंडांत अहवाल देण्याचे निश्चित केले. आतापर्यंत त्यापैकी पहिल्या खंडाचा मसुदा अहवाल सादर झाला आहे.

या मसुदा अहवालात- १. सिंचनासाठी अधिक तरतूद, २. गुणवत्तापूर्ण बियाणे व खते, ३. शेतमालाचे काढणीपश्चात नुकसान टाळणे, ४. अन्नप्रक्रियेला चालना ५. सामाईक राष्ट्रीय बाजारपेठ, ६. पीकविमा, ७. पोल्ट्री, मत्स्यपालन, मधमाशीपालन इ. शेतीपूरक व्यवसायांवर भर या सप्तसूत्रांची सखोल चर्चा करून शिफारशी केल्या आहेत. शेतकऱ्यांना संस्थात्मक स्रोतांकडून (बँका, वित्तीय संस्था, पतसंस्था इ.) होणारा कर्जपुरवठा वाढवावा, अशी आग्रही शिफारस समितीने केली आहे. तसेच समितीने मागणीप्रधान शेती, पिकांमध्ये बदल, जास्त उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड, बाजारव्यवस्थेत सुधारणा, शेतमालाची नासाडी रोखण्यासाठी शीतकरण सुविधा व इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी गुंतवणूक आदी मुद्यांवर भर दिला आहे. शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळण्यासाठी त्यांना फलोत्पादन व कृषिप्रक्रिया, कोल्ड स्टोअरेज या कामांत गुंतवले पाहिजे, असे समितीचे म्हणणे आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ फूड ॲंड ॲग्रिकल्चर (आयसीएफए) या प्रथितयश संस्थेने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी- १. शेती उत्पादकतेत वाढ, २. सिंचनाची उपलब्धता आणि इतर निविष्ठांचे व्यवस्थापन, ३. एकात्मिक शेतीपद्धती, ४. शेतमालाला चांगला भाव, ५. शास्त्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी खास प्रयत्न- हे उपाय गरजेचे असल्याचे म्हटले आहे.

प्रा. चंद आणि दलवाई समितीने केलेली मांडणी असो वा 'आयसीएफए'ने सुचविलेले उपाय असोत; हे सगळे ॲकॅडेमिक दृष्टीने आणि कागदावर योग्यच आहे. विविध तज्ज्ञ आणि आयोगांनी यापूर्वीही यातील बहुसंख्य उपाययोजना सुचविलेल्या आहेतच. प्रश्न आहे तो या उपाययोजना प्रत्यक्षात उतरतील का, याचा. त्यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्ती हवी आणि शेतीक्षेत्रात महाकाय आर्थिक गुंतवणूक करावी लागेल. घोडं नेमकं इथंच पेंड खात आहे. सिंचन हा शेतीचा प्राण आहे. आज देशातील आणि राज्यातील अनुक्रमे ६५ व ८५ टक्के शेती कोरडवाहू आहे. शेती किफायती करायची असेल तर पाणी हा घटक सगळ्यात महत्त्वाचा ठरतो. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करायचं असेल, तर देशात सिंचनावर ३ लाख कोटी रुपये खर्च करावे लागतील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. परंतु यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सिंचनासाठीची तरतूद आहे केवळ ३२ हजार कोटी. ती पासंगाला तरी पुरेल का? सिंचनाव्यतिरिक्त इतर पायाभूत सुविधांच्या बाबतीतही हीच बोंब आहे.

**पैशाचं सोंग कसं आणणार?**

शेतीक्षेत्रात सध्या देशाच्या एकूण जीडीपीच्या २.७६


Date of Publication - 9-11-2017

टक्के इतकीच सरकारी गुंतवणूक होते, ती वाढून ४ टक्के करण्याची गरज खुद्द प्रा. चंद यांनी व्यक्त केली आहे. सिंचन, तंत्रज्ञान, पूरक उद्योग यासाठी मोठी आर्थिक गुंतवणूक आवश्यक आहे.

दलवाई समितीने तर शेती क्षेत्रातील गुंतवणुकीसंदर्भात अतिशय सडेतोड भूमिका घेतली आहे. देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न पाच वर्षांत दुप्पट करण्यासाठी सुमारे ६ लाख ३९ हजार ९०० कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक आवश्यक आहे, असे समितीने म्हटले आहे.

शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नासाठी खासगी गुंतवणुकीत वार्षिक ७.८६ टक्के वाढ होणे गरजेचे आहे. तसेच शेती, सिंचन, ग्रामीण रस्ते, वाहतूक, ग्रामीण ऊर्जा या क्षेत्रांत मिळून सार्वजनिक गुंतवणुकीत वार्षिक १४.१७ टक्के वाढ होण्याची आवश्यकता आहे. २०१५-१६ या वर्षाशी तुलना करता शेतीक्षेत्रात खासगी गुंतवणुकीत दुप्पट, तर सार्वजनिक गुंतवणुकीत चार पट वाढ गरजेची आहे, तसे अनुकूल वातावरण निर्माण करण्याला प्राधान्य देणारी धोरणे आखण्याची गरज असल्याचे समितीने म्हटले आहे.

शेतीक्षेत्रासाठी महाकाय गुंतवणूक करण्याची सरकारची क्षमता आणि इच्छाशक्ती आहे का? शब्दांचे बाण कितीही फेकता येतील; परंतु पैशाचे सोंग कसे वठवणार, हा रोकडा सवाल आहे. मोदी किंवा जेटली या मुद्यावर मौन साधून बाकी शून्यातून ब्रह्मांडनिर्मितीचे विवेचन करत असतात.

बाकी शेतीविषयक प्रश्नांच्या अभ्यासासाठी आजपर्यंत कैक समित्या, आयोग, गट, उपगट, टास्क फोर्स नेमले गेले आहेत. बहुतेकांनी अत्यंत अभ्यासपूर्ण अहवाल सादर केले; परंतु या अहवालांचे पुढे होते काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कमी लागवडखर्चात अधिक उत्पादन, संस्थात्मक कर्जमर्यादा वाढविणे, पीक नुकसानभरपाईची खात्री, शेतमालास चांगला भाव मिळवून देणे, सिंचन, पीकहंगाम नसल्याच्या कालावधीत शेतकऱ्यांना पेन्शन आणि आरोग्यविम्याचे छत्र देणे आदी उपाययोजनांवर आजपर्यंत खूप चर्चा झालेली आहे. आजपर्यंतचे प्रत्येक सरकार या मुद्यांविषयी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत आले आहे, पण शेतकऱ्यांच्या वाट्याला प्रत्यक्षात फारसं काही आलं नाही. हे मुद्दे प्रत्यक्षात कसे उतरतील, धोरण आणि अंमलबजावणीच्या बाबतीत प्रत्यक्षात अमलात येणारी रणनीती काय, हा खरा कळीचा मुद्दा आहे. क्रियेवीण वाचाळता का व्यर्थ असते, याची प्रचीती शेतीक्षेत्रातील अरिष्टाकडे पाहून येते. शेतकरी अत्यवस्थ स्थितीत


राधामोहन सिंह


अशोक दलवाई


रमेश चंद

व्हेन्टिलेटरवर असताना रोगांच्या लक्षणांचीच चर्चा करण्यापलीकडे राजकीय नेतृत्व काही ठोस उपचार करताना दिसत नाही.

।। ३ ।।

समजा- असं मान्य करू की, सरकारने मोठी आर्थिक तरतूद करून सिंचन व इतर पायाभूत सुविधा उभारण्यात यश मिळवले; तर शेती उत्पादनात प्रचंड वाढ होईल, यात शंका नाही. परंतु या उत्पादनाचे भवितव्य काय, हा प्रश्न उपस्थित होतो. कारण या शेतमालाला रास्त बाजारभाव मिळाला नाही, तर सगळं मुसळ केरात जातं. शेतकऱ्यांचं उत्पन्न तर वाढत नाहीच, उलट उत्पादनखर्च वाढून तोटाही वाढतो. एकदा भरपूर उत्पादन हाती आलं की, त्याला चांगला भाव मिळवून देण्यासाठी योग्य ते धोरणात्मक निर्णय घेण्याऐवजी सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देतं- 'गरज सरो वैद्य मरो' असाच आजवरचा अनुभव आहे.

### चिंता'तूर' शेतकरी

गेल्या वर्षीचं तुरीचं उदाहरण यासंदर्भात क्लासिक आहे. शेतकरी अडाणी आहेत, ते नव्या तंत्रज्ञानाचा वापर करत नाहीत- अशी समजून करून घेऊन विविध तज्ज्ञ मंडळी आणि सरकारी अधिकारी शेतीक्षेत्राची चौखूर प्रगती होण्यासाठी जे काही उपाय सुचवत असतात, त्या सगळ्यांचा तूर उत्पादक शेतकऱ्यांनी अवलंब केला. देशात २०१५-१६ मध्ये तूरडाळीचा प्रचंड तुटवडा पडून भाव दोनशे रुपये किलोपर्यंत गेल्यामुळे जणू हाहाकार उडाला होता. हवालदिल झालेल्या सरकारने शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांनी त्याला प्रतिसाद देत २०१६-१७ मध्ये तुरीचं उत्पादन थोडं थोडकं नव्हे ६५ टक्के वाढवून दाखवलं. देशाची गरज भागविण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणतीही कसर बाकी ठेवली नाही. मग त्यांना योग्य भाव मिळावा म्हणून सरकारने तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवे होते. पण सरकारने वेळेवर निर्यातबंदी हटवली नाही, आयात रोखली नाही, स्टॉक लिमिट हटवली नाही. त्यात भर म्हणून गचाळ आणि अकार्यक्षम कारभारामुळे सरकारी तूर खरेदीचा बोजवारा उडाला. परिणामी तुरीचे दर गडगडले. शेतकऱ्यांना २०१५-१६ मध्ये सरासरी १० ते १२ हजार रुपये क्विंटल दर मिळाला होता; तर २०१६-१७ मध्ये सरासरी ३५०० ते ४१०० या दराने तूर व्यापाऱ्यांना विकावी लागली. दुप्पट उत्पन्नाचा गजर करणाऱ्या सरकारने शेतकरीविरोधी धोरणं राबविल्यामुळे तूर उत्पादकांचं उत्पन्न उलट आधीच्या वर्षीपेक्षा निम्मंच झालं.

बहुतांश तूर व्यापाऱ्यांनी स्वस्तात खरेदी करून झाल्यानंतर सरकार झोपेचे सोंग बाजूला ठेवून कामाला लागले. जून महिन्यात कडधान्यांवरची स्टॉक लिमिट हटवली. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात कडधान्यांच्या आयातीवर निर्बंध घातले आणि सप्टेंबरमध्ये कडधान्यांच्या निर्यातीवरची बंदी उठवली. सरकारने वेळीच हे निर्णय घेतले असते तर दरातील घसरणीला काही प्रमाणात अटकाव बसून शेतकऱ्यांना चार पैसे जादा मिळाले असते. तुरीचे दर प्रतिक्विंटल केवळ १००० रुपयांनी वाढले असते तरी शेतकऱ्यांच्या खिशात ४६०० कोटी रुपये गेले असते; तेही बाजारपेठेतून, सरकारी तिजोरीतून नव्हे.

राज्यातील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या २०.३६ लाख टन तुरीपैकी राज्य सरकारने मोठा गाजावाजा करून पण रडतखडत केवळ ६ लाख ७० हजार टन तूर खरेदी केली. याचा अर्थ उरलेली १३ लाख ६६ हजार टन तूर शेतकऱ्यांना स्वस्तात विकावी लागली. सरकारच्या धोरणात्मक निर्णयांनंतर तुरीचे भाव वाढून ४५०० रुपये क्विंटलवर गेले. याचा अर्थ सरकारने निर्णय घ्यायला उशीर केल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रतिटन किमान १० हजार रुपयांचे नुकसान झाले. म्हणजे फक्त तुरीत एकूण सुमारे १३६६ कोटी रुपयांचा फटका बसला. इतर कडधान्ये आणि सोयाबीनसारखे तेलबिया पीक यांतले नुकसान त्यात धरले, तर नुकसानीचा आकडा तीन हजार कोटींच्या घरात जातो. थोडक्यात, सरकारने दिरंगाई करून खासगी व्यापाऱ्यांना तेवढा नफा अलगद मिळवून दिला. हे झाले एकट्या महाराष्ट्राचे. संपूर्ण देशातील आकडा तर आणखीनच मोठा होईल

### महागाई दराचा भूलभुलय्या

केवळ तूरच नव्हे तर २०१६-१७ मध्ये मूग, साखर, सोयाबीन, कापूस, कांदा, भाजीपाला, डाळिंब, संत्रा यासह सर्वच प्रमुख शेतमालाचे दर पडले. चांगला पाऊस होऊनही आधी नोटाबंदी आणि नंतर शेतमालाच्या आयात-निर्यातीविषयी सरकारने चुकीची धोरणं राबविल्यामुळे ही परिस्थिती ओढवली. देशातील महागाईचा दर कमी करण्याचा आटापिटा म्हणून शेतमालाचे दर पाडण्याचं


Date of Publication - 9-11-2017

सरकारचं धोरण आहे. केंद्रीय सांख्यिकी संघटनेच्या आकडेवारीनुसार जूनमधील महागाई दराने (चलनवाढ) नीचांकी पातळी गाठली. जूनमध्ये महागाईचा दर १.५४ टक्के नोंदवण्यात आला. देशात १९७८ व १९९९ नंतर पहिल्यांदाच महागाईचा दर एवढा कमी झाला. मुख्यतः शेतमालाच्या घसरलेल्या किमती आणि औद्योगिक उत्पादनात झालेली घट यांचा हा परिणाम आहे. एक प्रकारे शेतीक्षेत्राचा बळी देऊन ही कामगिरी साध्य झाली.

यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्र सरकारने प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) पुरेशी नसली तरी काही ना काही प्रमाणात वाढ केली. या पिकांचा उत्पादनखर्च वाढल्याचे ग्राह्य धरून कृषिमूल्य व किंमत आयोगाने एमएसपी वाढविण्याची शिफारस केली होती. याचा अर्थ शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च वाढल्याची बाब केंद्र सरकारने मान्य केली. दुसरीकडे शेतमालाच्या किमती घसरल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न मात्र घटलं. म्हणजे, शेतकऱ्यांचे खर्च व परतावा यांचे गणित बिघडून शेतीधंदा तोट्यात गेल्याचे वास्तव सरकारी पातळीवर अधिकृतपणे मान्य करण्यात आल्याचं महागाई दराच्या आकडेवारीवरून स्पष्ट होतं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यापासून महागाई व वित्तीय तूट कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ते साध्य झालं की, रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरात कपात करवून घेऊन अर्थव्यवस्थेला चालना देण्याचं त्यांचं धोरण आहे. मुख्यतः शहरी भागात जनाधार असलेल्या भाजप सरकारनं हे धोरण राबवताना दुष्काळात सलग दोन वर्षे होरपळणाऱ्या शेतकऱ्यांकडं मात्र दुर्लक्ष केलं. शेतकऱ्यांना शेतमालाच्या दरवाढीच्या माध्यमातून मिळणारा परतावा सरकारनं मिळू दिला नाही. निर्यातीवर निर्बंध घालून आणि वारेमाप आयात करून शेतमालाच्या किमती आटोक्यात ठेवण्यासाठी शक्य ते सगळे प्रयत्न करण्यात आले.

### कापूसकोंडीची गोष्ट

नोटाबंदी, मग जीएसटी आणि आता निर्यात अनुदानात कपात यांसारख्या निर्णयांमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा उद्योग केंद्र सरकार करत आहे. यंदा कापसाला चांगला भाव मिळेल, अशी शक्यता असल्यामुळे देशातील शेतकऱ्यांनी कापसाचा पेरा २० टक्के वाढवला. जगातील सगळ्यात मोठा कापूस निर्यातदार देश असलेल्या अमेरिकेला चक्रीवादळाचा तडाखा बसल्यामुळे तिथे पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे आघाडीच्या आयातदार देशांनी कापूस खरेदीसाठी भारताकडे मोर्चा वळवला. परिणामी यंदा देशाची कापूस निर्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्के वाढण्याची शक्यता निर्माण झाली. पण केंद्र सरकारने २२ सप्टेंबर रोजी (कापड) निर्यातीसाठीच्या अनुदानात तब्बल ७४ टक्के घट करण्याचा तुघलकी निर्णय घेतला. याचा परिणाम म्हणून भारताची निर्यात महाग होणार असल्याने इतर देशांशी स्पर्धा करणे कठीण होणार. त्याचा फायदा उठवून पाकिस्तान, बांगलादेश, व्हिएतनाम, चीन हे देश जागतिक बाजारातील संधी हस्तगत करतील. भारताची कापूस निर्यात मात्र ढेपाळेल आणि त्यामुळे कापसाचे दर गडगडून शेतकऱ्यांना थेट फटका बसेल.

आधीच जीएसटीच्या अंमलबजावणीत प्रचंड घोळ घातल्याने व्यापाऱ्यांकडून कापडाची खरेदी जवळपास ठप्प झाल्यामुळे कापड उद्योग मंदीच्या भोवऱ्यात फेकला गेला आहे. दिवाळीसारख्या मोठ्या सणातसुद्धा उलाढाल थंड होती. देशाच्या एकूण अर्थकारणालाच सपाटून मार बसलेला असल्यामुळे ६७ कापड मिल बंद झाल्या आहेत. त्यामुळे संघटित आणि असंघटित क्षेत्रातील मिळून कापड उद्योगातील सुमारे ६७ ते ६८ हजार लोकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना कापूस-निर्यातीतून मोठा दिलासा मिळण्याची धुगधुगी शिल्लक असताना सरकारने निर्यात अनुदानकपातीचा तिरपागडा निर्णय घेऊन त्या आशेवरही पोतेरं फिरवलं आहे. यंदा हंगामाच्या सुरुवातीला कापसाला सरासरी दर मिळाला ४३०० रुपये क्विंटल. गेल्या वर्षीपेक्षा दरात २२ टक्के घसरण आहे.

### कडू साखर

यंदा उसाच्या रास्त आणि लाभदायी मूल्यात (एफआरपी) सरकारने ११ टक्के वाढ केली. मात्र दुसऱ्या बाजूला पाच लाख टन कच्ची साखर आयात करून साखरेचे दर वाढणार नाहीत याची तजवीज केली. चीनने केलेल्या आयातीमुळे २०१६ च्या उत्तरार्धात साखरेने जागतिक बाजारात उसळी घेतली होती. भारतीय कारखान्यांना यामुळे जागतिक बाजारात साखर विकणं फायदेशीर झालं होतं. त्या वेळी निर्यातीवर २० टक्के शुल्क लावण्याचा उफराटा निर्णय सरकारने घेतला. जागतिक बाजारात दर वाढल्यावर सरकार निर्यातीवर निर्बंध घालते


Date of Publication - 9-11-2017

आणि दर कमी असताना मात्र सरकार कारखान्यांवर साखर-निर्यातीची सक्ती करते. स्थानिक बाजारपेठेत दर वाढू लागले की, परदेशातून स्वस्तात आयात करते. त्यातच २०१६ च्या दिवाळीपूर्वी साखर कारखान्यांच्या साठ्यावर नियंत्रण आणण्याचा ऐतिहासिक निर्णय सरकारने घेतला. त्यामुळे कारखान्यांना मिळेल त्या भावात साखरेची विक्री करावी लागली. परिणामी, उत्पादनात मोठी घट अपेक्षित असतानाही दर पडले. देशातील दुसऱ्या कुठल्या उद्योगाला- स्टील असो वा सिमेंट- सरकार किती साठा ठेवायचा आणि किती विकायचा, हे सांगत नाही. साखर उद्योगाला मात्र वेगळा न्याय.

साखरेला दर मिळाला नाही, तर कारखाने उसाला कुठून भाव देणार? देशात २०१० मध्ये साखेचे दर घाऊक बाजारात ४० रुपये किलो आणि किरकोळ बाजारात ५० रुपये किलो होते. आज सात वर्षांनी साखरेचे किरकोळ बाजारातील दर ४० रुपये राहावेत, हे उद्दिष्ट ठेवून सरकार काम करत आहे. गेल्या सात वर्षांत लोकांच्या क्रयशक्तीत काही सुधारणा झाली नाही का; त्यांचे उत्पन्न वाढले नाही का; या कालावधीत उसाच्या उत्पादनखर्चात वाढ झाली की घट- या सगळ्या प्रश्नांची उत्तरं स्वयंस्पष्ट असूनही सरकारचे धोरण मात्र आडमुठेपणाचं आहे.

**सोयाबीन उत्पादक अडचणीत**

सध्या सोयाबीनची काढणी सुरू झालीय, परंतु हंगामाच्या सुरुवातीलाच सोयाबीनचे दर गडगडले आहेत. सोयाबीनची किमान आधारभूत किंमत प्रतिक्विंटल ३०५० रुपये आहे, परंतु सध्या बाजारात दर १९०० ते २६०० रुपयांदरम्यान आहेत. वास्तविक, सोयाबीनचे दर पडणार याचा पुरेसा आधी अंदाज येऊनही सरकारने हालचाल केली नाही. केंद्र सरकारने तातडीने खाद्य तेल आयातशुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. सोयाबीन निर्यातीसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. सरकारला यात स्वतःच्या तिजोरीतला नवा पैसा खर्चावा लागणार नाही. आयातशुल्कात वाढ करून मिळणारी रक्कम निर्यातीसाठी प्रोत्साहन म्हणून देता येऊ शकेल, परंतु सरकार याबाबतीत अजूनही ढिम्म आहे.

राज्यांच्या पातळीवर तातडीने करता येण्यासारखा उपाय म्हणजे सरकारी खरेदी. त्यातल्या त्यात मध्य प्रदेश सरकारने भावांतर योजना लागू करण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला. त्यानुसार सोयाबीनची प्रत्यक्ष खरेदी न करता बाजारभाव आणि किमान आधारभूत किंमत यातील फरक थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केला जाणार आहे. भ्रष्टाचार, गैरप्रकार व ढिसाळ व्यवस्थापन यामुळे बदनाम झालेल्या सरकारी खरेदीला हा प्रभावी पर्याय आहे; परंतु महाराष्ट्र सरकार मात्र सरकारी खरेदीवर अडून आहे. शिवाय या खरेदीसाठी केवळ १ लाख टनांचे उद्दिष्ट ठेवले आहे. उरलेले ९७ टक्के सोयाबीन कमी भावात व्यापाऱ्यांच्या घशात घालण्याचे हे सरकारपुरस्कृत षडयंत्र आहे. तसेच जाचक अटींमुळे सध्या सरकारी खरेदी कासवगतीने सुरू आहे.

**निर्यात ढेपाळली**

शेतकऱ्यांचं उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करायचे असेल तर कृषी निर्यात तिपटीने वाढणे आवश्यक आहे, असे निरीक्षण सेंटर फॉर एन्व्हायर्न्मेंट अॅन्ड अॅग्रिकल्चर आणि टाटा स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट ग्रुप यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या अभ्यास अहवालात नोंदविले आहे. जगात दूध उत्पादनात भारत पहिल्या क्रमांकावर तर फळे, भाजीपाला व मासे उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे; परंतु जागतिक कृषी व्यापारात भारताची स्थिती शोचनीय आहे. १५०० अब्ज अमेरिकी डॉलरच्या जागतिक कृषी व्यापारात भारताचा वाटा अवघा ३५ अब्ज डॉलरचा आहे. ही निर्यात २०२२ पर्यंत १०० अब्ज डॉलरपर्यंत जायला हवी, असे या अहवालात म्हटले आहे.

प्रत्यक्षात मोदी सरकार सत्तेत आल्यापासून भारताची निर्यात ढेपाळली आहे. अॅग्रिकल्चरल अॅन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्ट्स एक्सपोर्ट डेव्हलपमेंट अॅथॉरिटीच्या (अपेडा) आकडेवारीनुसार मनमोहनसिंग सरकारच्या कार्यकाळात (२००३-०४ ते २०१३-१४) शेती व संलग्न उत्पादनांची निर्यात ७.५ अब्ज डॉलरवरून तब्बल ४३.२ अब्ज डॉलरवर पोहोचली होती. मोदी सरकारच्या तीन वर्षांच्या काळात निर्यातीत २२ टक्के घट झाली. परिणामी, निर्यातीतून मिळणारं उत्पन्न तर घटलंच शिवाय निर्यात मंदावल्याने देशांतर्गत बाजारपेठेत शेतमालाचे दर कोसळले. मनमोहनसिंह सरकारने सूत्रं खाली ठेवली तेव्हा शेतकऱ्यांना शेतमाल निर्यातीतून ३ लाख कोटी रुपये मिळत होते. मोदी सरकारच्या काळात त्यात झपाट्याने घट झाली.

आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या शेतकऱ्यांना सरकार वाऱ्यावर सोडते; परंतु इतर उद्योगांसाठी मात्र पान्हा दाटून येतो. उदाहरणार्थ- स्टील उद्योग. चीनमधून स्वस्तात आयात होणाऱ्या स्टीलचा स्थानिक उद्योगाला फटका बसू


Date of Publication - 9-11-2017

नये, यासाठी सरकारने स्टीलवरील आयातशुल्क वाढवले. स्टीलची किमान आयात किंमतही निश्चित केली. तसेच सरकारी उद्योगांसाठी देशात उत्पादन झालेलेच स्टील वापरण्याची सक्ती करण्याचा सरकारचा विचार आहे. म्हणजे जागतिक बाजारातील तेजी-मंदीपासून स्टील उद्योगाचे रक्षण करण्यावर सरकारचा भर आहे. शेतीला मात्र हा न्याय नाही. शेतीला संरक्षण सोडाच; उलट शेतमालाच्या निर्यातीवर निर्बंध आणून सरकार शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेचाही फायदा घेऊ देत नाही.

मोदी सरकारच्या तीन वर्षांच्या कालावधीत शेतमालाच्या आयातीत मात्र ६५ टक्के वाढ होऊन ती २५.६ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. अशा तऱ्हेने भारतीय बाजारपेठ परदेशी शेतकऱ्यांच्या हाती देणं धोकादायक आहे. दर वर्षी आपण खाद्य तेल आणि डाळींच्या आयातीवर जवळपास एक लाख कोटी रुपये खर्च करतो. यातील काही हिस्सा देशातील शेतकऱ्यांना दिला, तर कडधान्ये व तेलबिया पिकांच्या उत्पादनात मोठी वाढ होऊ शकते. आयातीवरील अवलंबित्व कमी होऊ शकते. सध्या देशाची खाद्य तेलाची ६५ टक्के गरज आयातीच्या माध्यमातून भागवली जाते. देशात पेट्रोलियम पदार्थांनंतर खाद्य तेलावरच सर्वाधिक परकीय चलन खर्च केले जाते. या प्रचंड आयातीमुळे देशातील सोयाबीन उत्पादक शेतकरी आणि सोयाबीन प्रक्रिया उद्योग यांच्यावर विपरीत परिणाम झाला आहे. वास्तविक, सरकारने शेतकऱ्यांना योग्य परतावा देणारी धोरणे आखली, तर कडधान्ये आणि तेलबिया उत्पादनात देशाला स्वयंपूर्ण करण्याचे स्वप्न साकार होणे अशक्य नाही.

### आधारभूत किमतीत घट

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचं असेल, तर शेतमालाला मिळणाऱ्या किमान आधारभूत किमतीत वाढ झाली पाहिजे, हे साधं गणित आहे. परंतु, प्रत्यक्षात मोदी सरकारच्या कार्यकाळात शेतमालाच्या आधारभूत किमतीत वाढ होण्याचा वेग घटला आहे. मनमोहनसिंग सरकारच्या तुलनेत मोदी सरकारने आधारभूत किमतीत नाममात्र वाढ केली आहे. दोन्ही सरकारांनी केलेली वाढ पुढीलप्रमाणे- मोदी सरकारच्या काळात कापूस २.७ टक्के (२१ टक्के), तांदूळ ८ टक्के (२१ टक्के), मका ४.२ टक्के (३३.७ टक्के), तूर १६ टक्के (३४.४ टक्के), सोयाबीन ११ टक्के (५१.५ टक्के) अशी वाढ झाली. कंसातील आकडेवारी मनमोहनसिंग सरकारच्या काळातली वाढ दर्शवते.

तुरीच्या बाबतीत २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीत आधारभूत किमतीतील सरासरी वाढ ४१२ रुपये होती. विद्यमान सरकारच्या कार्यकाळात २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत आधारभूत किंमतीतील सरासरी वाढ २५० रुपये एवढीच भरते. देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तुरीला ७ हजार रुपये भाव देण्याची सूचना केली होती. पण २०१५-१६ मध्ये ४६२५ तर २०१६-१७ मध्ये ५०५० रुपये एवढीच आधारभूत किंमत देण्यात आली.

असे असूनही आमच्या सरकारने तुरीला इतिहासातला सगळ्यात जास्त हमीभाव दिला- असा आक्रमक दावा महाराष्ट्राचे अभ्यासू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कसे काय करतात, असा प्रश्न पडू शकतो. त्याचं उत्तर शोधण्यासाठी एक उदाहरण पाहू. समजा- मी एका कंपनीत नोकरीला लागल्यावर मला १०० रुपये पगार मिळाला. कंपनीने दुसऱ्या वर्षी ४० रुपये आणि तिसऱ्या वर्षी ६० रुपये पगारवाढ दिली. त्यामुळे माझा पगार दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी अनुक्रमे १४० आणि २०० रुपये झाला. नंतर मी कंपनी बदलली. त्या कंपनीने वर्षभरानंतर २५ रुपये पगारवाढ दिली. माझा पगार झाला २२५ रुपये. म्हणजे आधीच्या कंपनीत मला सरासरी ५० रुपयांची वाढ मिळत होती, तर नव्या कंपनीत २५ रुपयेच मिळाली. ती पुरेशी नसल्याची तक्रार करत मी पगार वाढविण्याची मागणी केली; तर कंपनी म्हणाली की, तू आधीच्या कंपनीत नोकरीला लागला तेव्हा १०० रुपये पगार होता, आम्ही तुला तुझ्या आजवरच्या इतिहासातला सगळ्यात जास्त म्हणजे २२५ रुपये पगार दिलाय. हा विक्रमी पगार जसा फसवा आहे, तसंच तुरीची यंदाची आधारभूत किमत विक्रमी असल्याचा दावा करणंही खुळेपणाचं आहे.

मुळात आधारभूत किमतींमध्ये वाढ म्हणजे महागाईला आमंत्रण आणि शहरी मतदारांचा रोष- असा भाजपचा दृष्टिकोन वाजपेयी सरकारच्या कार्यकाळापासून राहिला आहे. त्या वेळी तर (आधारभूत किमतींमध्ये नगण्य वाढ करून) अन्नधान्य व इतर जिन्नसांच्या किमती स्थिर ठेवल्या, ही सरकारची मोठी कामगिरी असल्याचा डांगोरा पिटला होता. मोदी सरकारच्या काळात भाषा वेगळी असली तरी आधारभूत किमतीत भरीव वाढ न करण्याच्या धोरणात सातत्य दिसते. वाजपेयी सरकार पायउतार


Date of Publication - 9-11-2017

झाल्यावर सत्तेत आलेल्या मनमोहनसिंग सरकारने कापसाची आधारभूत किंमत ४० टक्क्यांनी, गव्हाची ७१ टक्क्यांनी, सोयाबीनची ६१ टक्क्यांनी, तुरीची ४७ टक्क्यांनी, तांदळाची ५५ टक्क्यांनी व उसाची ११ टक्क्यांनी वाढवली होती. मंत्रिमंडळातल्या काही दिग्गज मंत्र्यांचा विरोध असतानाही तत्कालीन कृषिमंत्री शरद पवार यांच्या आग्रही भूमिकेमुळे ही वाढ करण्यात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कुठल्याही सरकारने शेतमालाच्या आधारभूत किंमती या प्रमाणात वाढवलेल्या नाहीत.

**आक्रसलेला पतपुरवठा**

शेतीसाठी वेळेवर आणि पुरेसा कर्जपुरवठा होत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय बांधले गेले आहेत. शेतीसाठीच्या पतपुरवठ्याची स्थिती सुधारल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे अशक्य आहे. वाजपेयी सरकारच्या काळात पीककर्जाचा व्याजदर १६ टक्के होता. मनमोहनसिंग सरकारने तो ६ टक्क्यांवर आणला. तसेच शेतीसाठी दिले जाणारे कर्ज ८६ हजार ९८१ कोटी रुपयांवरून दहा वर्षांत ७ लाख कोटी रुपयांवर नेलं. त्या तुलनेत मोदी सरकारच्या काळात पतपुरवठ्यात झालेली वाढ कमी आहे. तसेच अजूनही देशातील ४८ टक्के शेतकरी संस्थात्मक बँकिंगच्या जाळ्याबाहेर आहेत.

मुळात आज देशात ग्रामीण पतपुरवठाच आकुंचित झाला आहे. हा गंभीर आणि मूलभूत प्रश्न आहे. राष्ट्रीयीकृत बँकांचं बुडित कर्ज ४ लाख ७१ हजार कोटींपेक्षा जास्त आहे. या बँका 'एनपीए'च्या मुद्याशी झगडत असल्याने त्यांचा पीककर्ज वितरणात टक्का कमी झालाय. स्टेट बँकेत सहयोगी बँकांचं विलीनीकरण झाल्यानंतर ग्रामीण शाखांवर संक्रांत आली आहे. ग्रामीण भागातील सहकारी बँकिंग आधीच कोलमडलं आहे. त्यात नोटाबंदीनंतर सरकारच्या निर्णयांमुळे जिल्हा बँकांची प्रचंड कोंडी झाली. एकीकडे सहकारी बँकिंगला लागलेली उतरती कळा आणि दुसरीकडे शेतकऱ्यांना दारात उभे न करण्याचा राष्ट्रीयीकृत बँकांचा पवित्रा यामुळे ग्रामीण पतपुरवठा आक्रसून गेला आहे. त्यात रिझर्व्ह बँक ग्रामीण भागात सार्वजनिक किंवा सहकारी क्षेत्रातील बँकांना पर्याय म्हणून खासगी क्षेत्राला बँकिंगसाठी परवाने देत आहे. पण या बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. या सगळ्या परिस्थितीचा परिणाम म्हणून ग्रामीण जनता मायक्रोफायनान्स किंवा सावकाराच्या दावणीला बांधली जात आहे.

**जोखमीतून सुटका नाही**

शेतीमध्ये दोन प्रकारच्या जोखीम असतात. पिकाच्या लागवडीपासून ते पिकाच्या काढणीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर असलेली जोखीम म्हणजे प्रॉडक्शन रिस्क. यात निसर्ग, हवामानाचा घटक महत्त्वाची भूमिका बजावत असतो. ही जोखीम टाळणे पूर्णपणे शक्य नसले तरी शेतकऱ्यांना नुकसानीपासून किमान पातळीचे का होईना, संरक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी पीकविमा महत्त्वाचा ठरतो. मोदी सरकारने मोठा गाजावाजा करत पंतप्रधान पीकविमा योजना लागू करण्याची घोषणा केली. तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यातला एक मोठा अडथळा या योजनेमुळे दूर होईल, असा प्रचार करण्यात आला. पूर्वीच्या योजनेच्या तुलनेत नव्या योजनेत अनेक स्वागतार्ह बदल असले, तरी हा प्रचार वास्तवाला सोडून आहे. नव्या योजनेमुळे विम्याचे कवच मिळणाऱ्या पिकांचे क्षेत्र ३० टक्क्यांवर पोहोचले आहे. (पूर्वी ते २२ टक्के होते.) याचा अर्थ लागवडक्षेत्रापैकी आणखी ७० टक्के क्षेत्राला विमासंरक्षण मिळणे बाकी आहे. विमा हप्त्यापोटी शेतकऱ्यांना जे अनुदान दिले जाते, त्यातील प्रत्येकी ५० टक्के वाटा केंद्र आणि राज्य सरकार उचलते. हा बोजा वाढू नये, यासाठी महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी ऊस, तंबाखू आणि इतर नगदी पिके या योजनेतून वगळली आहेत. थोडक्यात, विम्याचा लाभ मिळणारे शेतकरी आणि क्षेत्र यांचा आकडा देशातील एकूण शेतकऱ्यांशी तुलना करता खूपच कमी आहे. शिवाय पीकविमा योजनेची अंमलबजावणी, नुकसानभरपाईची प्रक्रिया यात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या क्षेत्रात अजून किती मजल मारणे बाकी आहे, याची यावरून कल्पना यावी.

शेतीतली दुसरी जोखीम म्हणजे मार्केटिंग रिस्क. शेतमालाची काढणी झाल्यानंतर ते बाजारात विकून शेतकऱ्यांच्या हातात पैसे पडण्यापर्यंतच्या टप्प्यावरची जोखीम. शेतमालाच्या दरातील चढ-उतार, देशातील व जागतिक स्तरावरील उत्पादन, मागणी-पुरवठ्याचे गणित, शिल्लक साठा, आयात-निर्यातीची स्थिती, हवामान आदी अनेक घटक त्यावर परिणाम करतात. सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे शेतकऱ्यांची कशी परवड होते, हे तर आपण पाहिलेच; याशिवाय बाजार समित्यांचा कायदा, माल साठवणुकीच्या सुविधा, प्रक्रिया आदी घटक महत्त्वाचे ठरतात. पणन सुधारणा (मार्केटिंग रिफॉर्म्स) हा


Date of Publication - 9-11-2017

मुद्दा यासंदर्भात निर्णायक आहे.

### पणन सुधारणांची बिकट वाट

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नीती आयोगाने पणन सुधारणांवर भर दिला आहे. कंत्राटी शेती, थेट विक्री, खासगी बाजार, ऑनलाईन व वायदेबाजार, खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आदी बाबींचा त्यात समावेश आहे. देशात आर्थिक सुधारणा, खुली बाजारव्यवस्था स्वीकारल्यानंतर इतर क्षेत्रांमध्ये बंधने हटविण्यात आली; परंतु कृषिक्षेत्र मात्र बंधमुक्त झाले नाही, याकडे आयोगाने लक्ष वेधले आहे.

शेतमाल बाजारव्यवस्थेतील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची मक्तेदारी मोडून काढणाऱ्या नव्या कायद्याचे प्रारूप केंद्र सरकारने तयार केले आहे. राज्य सरकारांनी हा कायदा स्वीकारला, तर शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत. भाजपशासित किमान १५ राज्यांमध्ये हा कायदा अस्तित्वात आला तरी शेतीक्षेत्रातील तो मोठा सुधार ठरेल, असे मानले जात आहे. विविध हितसंबंधी घटकांच्या अभद्र युतीमुळे बाजारसमित्या म्हणजे शेतकऱ्यांचे कत्तलखाने बनल्या आहेत. सध्याच्या बाजार समिती कायद्यानुसार शेतकऱ्यांना बाजार समितीतच शेतमाल विकणे बंधनकारक आहे. काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारच्या काळात यात बदल करणारा मॉडेल ॲक्ट आणण्यात आला होता; परंतु मोजक्या राज्यांनीच तो स्वीकारला असून, त्यांनीही संपूर्ण तरतुदी लागू केल्या नसल्यामुळे अर्धवट अंमलबजावणी झाली आहे. महाराष्ट्र हे त्याचे उत्तम उदाहरण.

पणन सुधारणा प्रत्यक्षात येणे ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. शेती हा राज्यसूचीतला विषय असल्यामुळे राज्य सरकारांची संमती आवश्यक ठरते. तसेच विविध हितसंबंधी घटकांचे अडथळे पार करून सुधारणा मार्गी लावण्यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्ती गरजेची आहे. येत्या पाच वर्षांत हे सगळे विषय मार्गी लागतील, अशी खात्री बाळगणे धाडसाचे ठरेल.

### शेतमालाची मूल्यसाखळी

शेतमाल पुरवठ्याच्या साखळीत मध्यस्थांची संख्या खूप असल्याने उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे नुकसान होते. ही साखळी कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी आपल्याकडे 'मध्यस्थच नको, शेतकऱ्यानेच आपला माल थेट ग्राहकाला विकावा' यासारख्या रोमँटिक कल्पनांचे खूळ माजलेले असते. या पार्श्वभूमीवर एकात्मिक मूल्य साखळी (इन्टिग्रेडेट व्हॅल्यू चेन) विकसित करणे ही सर्वंकष सुधारणा ठरणार आहे. शेतकरी आणि ग्राहक या दोन टोकांतील अंतर कमी करण्यात आलेले अपयश ही देशातील शेती क्षेत्रापुढील सर्वात मोठी समस्या आहे, असे निरीक्षण डॉ.अशोक दलवाई यांनी नोंदवले आहे.

'सध्या शेतीक्षेत्र हे केवळ पिकवण्यापुरतं मर्यादित आहे. हे स्वरूप बदलून त्याचे रूपांतर कृषी उद्योगामध्ये करण्यासाठी केंद्र सरकार खासगी क्षेत्राच्या सहकार्याने कृषी मूल्यसाखळी विकसित करत आहे,' असे दलवाई यांनी म्हटले आहे. राज्याच्या पातळीवर सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वातून एकात्मिक मूल्यसाखळी विकसित करणे, हीच शेतीक्षेत्राच्या विकासाची पुढची दिशा असेल. राज्यपातळीवर पिकवल्या जाणाऱ्या शेतमालाचे मूल्यवर्धन त्यातून होईल. त्यातून शेतकऱ्यांचाही फायदा होईल आणि लोकांच्या पोषणविषयक गरजाही भागविता येतील, असे त्यांना वाटते.

महाराष्ट्रात निवडक फळपिकांच्या क्षेत्रात एकात्मिक मूल्यसाखळी विकसित करण्याचा प्रकल्प पाचेक वर्षांपूर्वी सुरू करण्यात आला. जागतिक वित्तीय संस्थांनी त्यासाठी अर्थसाह्य केले आहे. परंतु अपेक्षित धोरणात्मक सुधार होत नसल्यामुळे खासगी गुंतवणूकदार, उद्योजकांकडून त्याला फारसा प्रतिसाद मिळत नाही. परिणामी, हा प्रकल्प रखडला आहे. या पार्श्वभूमीवर मूल्यसाखळी विकसित करणे हे अत्यावश्यक असले तरी महाकठीण कार्य आहे, याचे भान सुटू देता कामा नये.

भारत शेतमालाच्या उत्पादनात आघाडीवर असला, तरी त्यावर प्रक्रिया करण्याच्या सुविधांबाबत मात्र त्याचा तळाचा क्रमांक आहे. देशात ५ टक्क्यांहून कमी फळे व भाजीपाल्यावर आणि २० टक्क्यांहून कमी दुधावर प्रक्रिया केली जाते. उसाला जशी साखर कारखानदारीच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योगाची जोड मिळाली, तशी ती इतर पिकांमध्ये विकसित झाली पाहिजे; तरच शेतकऱ्यांना पर्याय मिळतील. फळे व भाजीपाला हा नाशवंत शेतीमाल असल्यामुळे शेतकऱ्यांची सौदाशक्ती कमी होते, बाजारभावातील चढ-उताराचा मोठा फटका बसतो. पायाभूत सुविधा आणि मार्केटिंग चॅनेलचा अभाव ही मोठी कमतरता आहे. या संदर्भात काही तुरळक प्रयत्न होत आहेत. उदा. मदर डेअरीने सफल मॉडेल आणलं आहे.


Date of Publication - 9-11-2017

त्यात गावपातळीवर माल गोळा करणे, त्याचे ग्रेडिंग, पॅकेजिंग करणे आणि मदर डेअरीच्या यंत्रणेच्या माध्यमातून त्याची वाहतूक व शहरातील मिल्क पार्लर्समध्ये त्यांची विक्री- असे हे मॉडेल आहे. ‘अमुल’नेसुद्धा हेच मॉडेल वापरून फळे व भाजीपाला विपणनाच्या क्षेत्रात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. पण हे सगळे अजून लहान स्केलवर आणि प्राथमिक टप्प्यावर आहे. या अशा प्रयत्नांचा गुणाकार झाला पाहिजे, त्यासाठी सरकारने प्रोत्साहन दिले पाहिजे.

‘असोचेम’च्या अहवालानुसार भारतात साठवण आणि शीतगृह सुविधांच्या अभावामुळे दर वर्षी एकूण उत्पादनाच्या ४० ते ५० टक्के दूध, फळे आणि भाजीपाल्याची नासाडी होते. वाया जाणाऱ्या या उत्पादनांची किंमत ४४० अब्ज डॉलरपेक्षा अधिक आहे. थेट शेतकऱ्यांच्या खिशाला बसणारा हा फटका आहे. पायाभूत सुविधांचा अभाव, प्रशिक्षित कामगारांची कमतरता, मागासलेले तंत्रज्ञान आणि सतत खंडित होणारा वीजपुरवठा हे देशात शीतगृहसाखळीच्या सुविधा निर्माण होण्यातील प्रमुख अडथळे आहेत, असे ‘असोचेम’चे मुख्य सचिव डी.एस.रावत यांनी स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर कृषिप्रक्रिया उद्योगात नव्या क्षमता निर्माण करण्यासाठी केंद्राच्या पातळीवर काही पावलं उचलली जात असली, तरी त्यांची गती आणि व्याप्ती कमी आहे. ती वाढवल्याशिवाय शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढणार नाही.

### दुधात मिठाचा खडा

देशातील लाखो भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांना आणि महिला शेतकऱ्यांना रोजच्या रोज ताजा पैसा मिळवून देणारा व्यवसाय म्हणून डेअरी क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण आजच्या घडीला पायाभूत सुविधांची (कोल्ड स्टोअरेज, चिलिंग प्लॅन्ट्स, बल्क कुलर्स, रेफ्रिजरेटेड व्हॅन्स, इन्सुलेटेड टँकर्स) दयनीय अवस्था, ध्येयवाद व व्यावसायिक दृष्टिकोनाच्या अभावामुळे सहकारी संस्थांचे ‘संस्थानां’मध्ये झालेले रूपांतर, व्यवस्थापनखर्चात वाढ आणि गैरप्रकारांमुळे डबघाईला आलेले दूध संघ आदी समस्यांमुळे दुधाचा धंदा संकटात सापडला आहे. पशुखाद्य व इतर बाबींमुळे उत्पादनखर्चात मोठी वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना मात्र दुधाला तुटपुंजा दर मिळत आहे. महाराष्ट्र सरकारने उत्पादकांना दुधाचे दर वाढवून देण्याची घोषणा केली, परंतु प्रत्यक्षात तोंडाला पाने पुसली. त्यातच महाराष्ट्रासह अनेक भाजपशासित राज्यांनी गोवंशहत्याबंदी यांसारखे प्रतिगामी कायदे लागू केल्यामुळे शेतकऱ्यांचं कंबरडं मोडलं आहे.

केंद्र सरकारने दुग्धप्रक्रिया आणि पायाभूत सुविधा उभारणीकरता अर्थसंकल्पात ‘नाबार्ड’च्या माध्यमातून तीन वर्षांसाठी आठ हजार कोटींचा निधी उभारण्याचा निर्णय घेतला, हीच काय ती समाधानाची बाब. त्यामुळे प्रतिदिन ५०० लाख लिटर दुग्धप्रक्रियेची अतिरिक्त क्षमता निर्माण होईल आणि ग्रामीण उत्पन्नात दर वर्षी ५० हजार कोटींची भर पडेल, असे ‘अमुल’चे व्यवस्थापकीय संचालक आर. एस. सोधी यांचे मत आहे. परंतु, हा निधी केवळ सहकारी दूध संस्थांसाठी असून कॉर्पोरेट क्षेत्राला त्यातून वगळले आहे.

हवामानातील बदल, पावसाच्या वितरणाचे बदललेले स्वरूप आणि कायमस्वरूपी दुष्काळी प्रदेशाचे वास्तव समजून घेऊन तिथे शेतकऱ्यांना तोट्याच्या गर्तेत घालणाऱ्या धान्यपिकांच्या शेतीचा फेरविचार करून पशुसंवर्धन शेतीसारखे पर्यायी मॉडेल विकसित करण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. तसेच रेशीमशेती, पोल्ट्री, डेअरी, मत्स्यपालन, मधमाशीपालन आदी व्यवसायांचा शेतीला जोडधंदा म्हणून नव्हे, तर स्वतंत्र व्यवसाय म्हणून विचार करायला हवा. परंतु पायाभूत सुविधा, बाजार, योजना आणि धोरणे या चारही आघाड्यांवर सरकारची कामगिरी सुमार आहे, मग यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार तरी कसे?

### राज्यांची भूमिका निर्णायक

शेती हा राज्यसूचीतीला विषय आहे. सिंचनासारख्या पायाभूत सुविधा असोत, कृषिविकासाच्या विविध योजना असोत की बाजारव्यवस्थेत सुधारणा करण्याचे मुद्दे असोत; राज्यांची साथ आणि तयारी नसेल, तर केंद्र सरकारचे संकल्प प्रत्यक्षात उतरणं अशक्य असतं. बाजार समिती कायद्यातील बदल, खंडाने घेतलेल्या जमिनींसाठी कर्ज व विमा मिळावा यासाठी कायद्यात आवश्यक बदल, कंत्राटी शेतीचा कायदा यासाठीही राज्यांची संमती आवश्यक आहे. तसेच किमान आधारभूत किमतीला शेतमाल खरेदीची सध्याची पद्धत शेतकऱ्यांना फारसा दिलासा देऊ शकलेली नाही. कारण केवळ गहू व तांदूळ या पिकांचीच सरकार मोठ्या प्रमाणावर खरेदी करते. त्यामुळे कडधान्ये, ज्वारी, बाजरी व इतर पिकांकडे दुर्लक्ष होऊन त्यांचे


Date of Publication - 9-11-2017

उत्पादन घटले आहे. यावर उपाय म्हणून सरकारने शेतमाल खरेदी करण्याऐवजी बाजारभाव आणि आधारभूत किंमत यातील फरक शेतकऱ्यांना द्यावा, अशी सूचना नीती आयोगाने केली आहे. परंतु मध्य प्रदेश वगळता इतर राज्यांनी त्याकडे दुर्लक्ष करणे पसंत केले. महाराष्ट्रासह अनेक राज्यांत कमजोर आर्थिक स्थितीमुळे राज्यांचा वाटा पुरेसा आणि वेळेवर दिला जात नसल्याने कृषि-विकासाच्या अनेक योजनांचा बट्ट्याबोळ झाला आहे. तसेच राज्यांना विश्वासात न घेता केंद्र सरकार आयात-निर्यातीचे निर्णय घेत असते. त्यामुळे शेतमालाचे भाव पडून शेतकऱ्यांचा रोष राज्य सरकारांना सहन करावा लागतो.

थोडक्यात, शेतमालाला उत्पादनखर्चापेक्षाही कमी भाव मिळत असेल, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे होणार- हा मुख्य मुद्दा आहे. कृषी विकास दर वाढला तरी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा आलेख मात्र उतरतो. सरकारची धोरणं शेतकरीविरोधी आहेत, याचं हे फलित. राजकीय इच्छाशक्ती दाखवून ही धोरणं बदलावी लागतील. ते न करता तुटपुंज्या आर्थिक तरतुदी करून सरकार शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करू असे सांगत असेल तर ते मृगजळच ठरेल.

॥ ४ ॥

क्षणभर आपण कल्पनाशक्तीचा लगाम सैल सोडू. समजू की- वर चर्चिलेल्या सगळ्या सुधारणा प्रत्यक्षात आल्या, पायाभूत सुविधांची उभारणी झाली, भक्कम आर्थिक तरतूद करण्यात आली, सरकारने धोरणं बदलली, शेतमालाला चांगला भाव मिळाला, शेतीचा विकासदर १०.४ टक्के राहिला (जो अशक्यप्राय आहे); तरीसुद्धा शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट व्हायला किमान १० वर्षे लागतील, असं खुद्द प्रा. रमेश चंद यांनी कबूल केलं आहे. २०२२ पर्यंत ७५ टक्के उत्पन्न वाढू शकेल, तर १०० टक्के उत्पन्न वाढण्यासाठी २०२५ पर्यंत वाट पाहावी लागेल, असं त्यांचं म्हणणं आहे. थोडक्यात आखूडशिंगी, बहुगुणी, बहुदुधी म्हैस मिळाली; तर दुध सात वर्षांत नाही पण दहा वर्षांत दुप्पट होईल, असा याचा अन्वयार्थ. पण प्रत्यक्षात सरकारची धोरणं सध्या थोडं-फार का होईना दूध देणाऱ्या दुधाळ म्हशीला भाकड करून टाकणारी आहेत. त्यामुळे दुप्पट उत्पन्न हे दिवास्वप्नच ठरणार, यात शंका नाही.

प्रा.रमेश चंद किंवा डॉ.अशोक दलवाई यांनी सरकारकडून व्यक्त केलेल्या अपेक्षा, मांडलेल्या पूर्वअटी, त्यांना अपेक्षित असलेली शेतीक्षेत्रासाठीची प्रचंड आर्थिक गुंतवणूक या बाबी म्हणजे आकाशातला चंद्र तोडून मागण्यासारखं आहे. त्याची पूर्तता झाली नाही तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होणार नाही, हा त्यांच्या मांडणीचा व्यत्यास. पण ते सरकारी गोटात असल्यामुळे 'पोपट मेला आहे' हे त्यांना थेट आणि उघडपणे सांगता येत नाही, एवढेच. खरं तर ही 'बिरबलाची खिचडी' आहे. पण तरीही ती 'खाऊनिया तृप्त बहुत जन जाहले,' असा दावा मोदी, त्यांचे शागीर्द आणि भक्त करणार यात वाद नाही. परंतु चंद, दलवाई, अरविंद सुब्रमण्यन आणि त्यांच्यासारख्या काही मोजक्या मंडळींना शेतकऱ्यांबद्दल तळमळ आहे. 'शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे आणि शेतीवरचं अरिष्ट दूर झालं पाहिजे' यासाठी ते सरकारदरबारी प्रामाणिकपणे किल्ला लढवत आहेत, हे नाकारून चालणार नाही. तसेच नितीन गडकरी यांच्यासारख्या वरिष्ठ मंत्र्यानेही आपल्या खात्याचा विषय नसूनही शेतीच्या प्रश्नांमध्ये गांभीर्याने लक्ष घातलं आहे. डाळी आणि खाद्ये तेलाच्या बाबतीत उशिरा का होईना जे निर्णय झाले, ते गडकरींनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांची बाजू लावून धरल्यामुळेच, हे मान्य करावे लागेल. गडकरींच्या प्रयत्नांना पंतप्रधान कार्यालयातील एका अधिकाऱ्याची मोलाची साथ लाभली. त्यामुळे सगळाच काही अंधार नाही; उजेडाची चिमुकली का होईना, तिरीप दिसते आहे.

शेतकऱ्यांचं उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करणार ही नरेंद्र मोदींची घोषणा प्रतीकात्मक आहे, असं आपण मानू. त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहू. सध्या शेतीतून मिळणारं उत्पन्न तुटपुंजं आहे. देशातील ५३ टक्के शेतकरी कुटुंबांना- ज्यांची जमीनधारणा ०.६३ हेक्टरपेक्षा कमी आहे- निव्वळ शेतीपासून मिळणारे उत्पन्न इतके कमी आहे की त्यांची गरिबीपासून सुटका होऊ शकत नाही. कोरडवाहू-अल्पभूधारक शेतकऱ्याची मिळकत सरकारी नोकरीतल्या चपराशापेक्षा कमी आहे; त्यामुळे दुसरा पर्याय मिळाला, तर शेती सोडून देण्याची इच्छा असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या प्रचंड आहे. पराभव निश्चित असलेली लढाई किती दिवस लढायची, आपली दुसरी पिढी तरी या शेतीच्या खातेऱ्यात पडू नये- ही सार्वत्रिक भावना आहे. देशातील निम्मी लोकसंख्या रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असताना शेतीक्षेत्राची ही दुरवस्था गंभीर आहे. शेतीचंच नव्हे, तर अख्ख्या समाजाचंच भवितव्य त्यामुळे काळवंडून जाणार आहे. म्हणून या संकटाची भीषणता समजून घेऊन शेतकऱ्यांचं हित जपण्याकडे आणि त्यांचं उत्पन्न

वाढविण्याकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ही गरज अधोरेखित करण्याचं आणि त्याविषयी देशभरात जाणीव प्रखर करण्याचं कार्य मोदींच्या घोषणेमुळे सिद्धीस गेलं, असं मानू. त्यामुळे त्यांचा उद्देश प्रामाणिक असेल, तर आकड्यांची कसोटी अधिक न ताणता त्यांच्या संकल्पाचे स्वागत करू.

शेतीची दुःस्थिती बदलणं हे कठीण असलं तरी अशक्य नाही, हे जगातील काही देशांनी दाखवून दिलं आहे. उदाहरणार्थ- चीन. तिथे आर्थिक सुधारणांच्या पहिल्या काही वर्षांत (१९७८-८६) शेती उत्पन्नात वार्षिक १४ टक्के, तर कृषी जीडीपीमध्ये ७.१ टक्के वाढ झाली- असं निरीक्षण डॉ.अशोक गुलाटी यांनी नोंदवलं आहे. त्यामुळे केवळ सहा वर्षांत गरिबीचे प्रमाण निम्म्यावर आले. ग्रामीण क्रयशक्ती वाढल्यामुळे औद्योगिक उत्पादनांच्या मागणीत प्रचंड वाढ झाली. ती पुरी करण्यासाठी 'टाऊन ॲन्ड व्हिलेज एंटरप्रायजेस' मॉडेल विकसित झाले. शिवाय या सगळ्यामुळे आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम अधिक आक्रमकपणे राबविण्यास राजकीय बळ मिळाले, असे डॉ.गुलाटी यांचे प्रतिपादन आहे.

चीनला हे कसे साध्य झाले? चीनने जमीनसुधारणांच्या बरोबरीने शेतमालाला अधिक भाव कसा मिळेल, यासाठी जाणीवपूर्वक आणि सातत्याने प्रयत्न केले. शेतमालाच्या आधारभूत किमतींमध्ये मोठी वाढ केली. अगदी २०१४-१५ मध्ये चीनने गव्हासाठी प्रतिटन ३८५ डॉलर्स किमान आधारभूत किंमत जाहीर केली होती. त्या वेळी भारतात प्रतिटन २२६ डॉलर इतकी आधारभूत किंमत होती. जगातील अनेक देशांमध्ये शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाच्या मूल्याच्या प्रमाणात त्यांना थेट मदत केली जाते. त्याला प्रोड्युसर सपोर्ट एस्टिमेट (पीएसई) अशी संज्ञा आहे. कमी दरात निविष्ठांचा पुरवठा, शेतमालाला अधिक भाव, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी थेट मदत आणि पीकविमा यासाठी शेतकऱ्यांना मोठे साह्य केले जाते. चीन १९९५-९७ मध्ये शेतकऱ्यांना २ टक्के पीएसई द्यायचा; ते प्रमाण २०१२-१४ मध्ये १९ टक्क्यांवर गेले. चीन आपल्या शेतकऱ्यांना जागतिक बाजारातील चढ-उताराची झळ लागू नये यासाठी विविध शेतमालाच्या आयातीचा कोटा निश्चित करत असतो. कापसासारख्या शेतमालाची आयात कधी व किती करायची हे ठरवतो. शेतकऱ्यांच्या खिशात अधिक पैसे जातील, यासाठी चीनने सातत्याने प्रयत्न केले.

चीन सोडा; व्हिएतनामसारख्या चिमुकल्या देशानेही गेल्या तीन दशकांत शेतीक्षेत्रात केलेली प्रगती भारताला आरसा दाखवणारी आहे. पराकोटीचं दारिद्र्य, अमेरिकेशी युद्ध यातून मार्ग काढत या देशाने शेतमाल निर्यातीच्या क्षेत्रात अचाट झेप घेतली; तेही अन्नसुरक्षेशी अजिबात तडजोड न करता. तांदूळ उत्पादनात स्वयंपूर्ण झाल्यानंतर या देशाने कॉफी, रबर, काळी मिरी, काजू, ड्रॅगन फ्रूट, मासे यांच्या निर्यातीत आघाडीचं स्थान पटकावलं. त्यातून मिळालेल्या पैशांतून शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. विविध पिकांचे क्लस्टर तयार करून मोठ्या प्रमाणावर उत्पादन, प्रक्रिया आणि निर्यात यांची घडी बसवली.

हे सगळं आपल्याकडेही अशक्य नाही. एकच उदाहरण घेऊ. भारताची २००६-०७ मध्ये मासे, झिंगे अशा समुद्री अन्नाची निर्यात केवळ ८ हजार ३६३ कोटी रुपये होती. ती दहा वर्षांमध्ये जवळपास पाचपट होऊन ३७ हजार ८७० कोटींवर गेली आहे. अमेरिका, जपान आणि युरोपातील प्रगत देश आपले प्रमुख ग्राहक आहेत. झिंग्यांच्या शेतीमध्ये दक्षिणेकडील राज्यांनी केलेल्या प्रगतीमुळे हे घडून आलं. सरकारने योग्य धोरणं आखल्यामुळे हे यश मिळालं. या 'सक्सेस स्टोरी'ची इतर शेतमालांमध्ये, शेतीपूरक उत्पादनांमध्ये पुनरावृत्ती करणं शक्य आहे. शिवाय स्थानिक बाजारपेठ ही आपल्यासाठी एक मोठी संधी आहे. वाढती लोकसंख्या हे आपलं ॲसेट आहे. शहरीकरणाचा वेग, वाढता मध्यमवर्ग यामुळे क्रयशक्ती वाढत असल्याने शेती उत्पादनांची मागणी वाढती राहणार आहे.

### प्रश्न कमिटमेंट आणि इंटिग्रिटीचा

योग्य दिशेने ठोस प्रयत्न केले, तर सध्याची परिस्थिती पालटू शकते. सध्या शेतीक्षेत्रावर आलेले अरिष्ट अभूतपूर्व आहे. ही खरोखरच आणीबाणीची वेळ आहे. त्यातून मार्ग काढायचा असेल, तर धाडसी कार्यक्रमाची गरज आहे. शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं हा त्या दृष्टीने नरेंद्र मोदींचा एक धाडसी प्रयत्न आहे, असं समजू. पण प्रश्न आहे तो मोदींच्या कमिटमेंट आणि इंटिग्रिटीचा. ते स्वतः शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कितपत गंभीर आहेत, याचा. महाराष्ट्रातील 'जाणत्या नेत्या'शी शेतकरी प्रश्नांवर झालेल्या चर्चेदरम्यान मोदींनी 'आपल्याला उत्पादकांची नव्हे तर ग्राहकांची जास्त काळजी आहे' असं स्पष्ट सांगून टाकलं होतं.


Date of Publication - 9-11-2017

शेतकरीविरोधी धोरणं सातत्याने राबवून त्यांनी त्याची प्रचीती दिली आहेच. त्यांच्या कथनी आणि करणीतल्या फरकामुळे 'अच्छे दिना'चं बियाणं उगवलंच नाही.

मोदींना शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीचा धाडसी संकल्प खरोखर प्रत्यक्षात उतरवायचा असेल; तर व्हिजन, व्यूहरचना, आर्थिक तरतूद आणि नेतृत्व (राजकीय आणि प्रशासकीय) हे मुद्दे निर्णायक आहेत. पहिल्या तीन मुद्यांबाबत सगळा आनंदीआनंद असल्याचे आतापर्यंतच्या चर्चेत पुरेसे स्पष्ट झाले आहेच. राहिला मुद्दा तो नेतृत्वाचा. मोदी आपल्या संकल्पाबाबत थोडेही गंभीर असते, तर त्यांनी राधामोहनसिंह यांना पदावरून कधीच हटवलं असतं. मोदींनी इतर अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू दिला, परंतु संघाचा आशीर्वाद असलेल्या राधामोहनांना हात लावला नाही. वास्तविक, स्वातंत्र्यानंतर देशाला लाभलेल्या कृषिमंत्र्यांमध्ये सर्वाधिक सुमार, निष्प्रभ आणि अकार्यक्षम मंत्री म्हणून गणना व्हावी, अशी त्यांची एकूण कारकीर्द आहे. कृषी खात्याला महत्त्व मिळवून देणाऱ्या शरद पवारांनंतर राधामोहनांकडे या खात्याची धुरा यावी, हा खरं तर नियतीने पवारांवर उगवलेला सूड आहे.

दुसरा मुद्दा आहे तो खुद्द पंतप्रधान मोदींच्या भूमिकेचा. देशात साठच्या दशकात अन्नधान्याचा भीषण तुटवडा पडल्याने भुकेच्या प्रश्नाने गंभीर वळण घेतलं होतं. या संकटावर मात करण्यासाठी कृषी शास्त्रज्ञांनी अचंबित करणारी हरित क्रांती घडवून आणली, परंतु व्हिजन आणि प्रखर इच्छाशक्तीचा प्रत्यय देत राजकीय नेतृत्वाने या कामी निर्णायक भूमिका बजावली होती. त्याशिवाय शास्त्रज्ञांना कुठलंही कर्तृत्व गाजवणं शक्य झालं नसतं. तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी अक्षरशः चमत्कार घडवून आणला. त्यांनी निष्ठेने, कौशल्यपूर्वक आणि युद्धपातळीवर ही स्थिती हाताळली. सी. सुब्रमण्यमसारख्या मंत्र्याची त्यांना भक्कम साथ लाभली. नंतर इंदिरा गांधींनीही तो कार्यक्रम पुढे नेला. आज ओढवलेल्या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेता, शास्त्रीजींचा आदर्श समोर ठेवून शेतीच्या प्रश्नाला भिडण्याची नितांत आवश्यकता आहे. (अर्थात मोदी आणि शास्त्रीजींची अनाठायी तुलना करणे योग्य नव्हे.)

मोदींनी राजकीय इच्छाशक्ती दाखवून ठोस प्रयत्न केले, तर शेतीक्षेत्रात नक्कीच चांगले बदल घडतील आणि ते करण्याची ही आणीबाणीची वेळ आहे. परंतु मोदी एका बोटावरची थुंकी दुसऱ्या बोटावर करण्याचा हातखंडा प्रयोग करत घोषणा आणि जुमलेबाजीतच मश्गुल आहेत. मोदींनी 'काँग्रेसमुक्त भारता'ची शपथ घेतली असली, तरी पंडित नेहरूंप्रमाणे उत्तुंग आणि जागतिक स्तरावर मान्यता असणारं नेतृत्व म्हणून आपला उदय व्हावा, ही त्यांची मनीषा काही लपून राहिलेली नाही. 'प्रतिनेहरू' होण्याचा त्यांनी जणू ध्यास घेतला. (ही धडपड किती निष्फळ, अंगाशी येणारी आणि हास्यास्पद ठरतेय याची एव्हाना कल्पना आली असेल.) परंतु, एका बाबतीत नेहरूंच्या जवळ जाण्याचं त्यांना साधलं आहे. नेहरूंनी आधुनिक भारताचा पाया घातला, देशाची जडण-घडण केली हे त्यांचे ऋण मान्य करूनसुद्धा त्यांनी शेतीवषयी स्वीकारलेल्या धोरणाचे दुष्परिणाम देश आजही भोगतो आहे, हे विसरून चालणार नाही. 'Everything else can wait but not agriculture' असं ते म्हणाले जरूर; परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या लुटीवर आधारित व्यवस्था उभारण्यात त्यांनी धन्यता मानली. स्वातंत्र्योत्तर काळातलं एकूणच शेतीचं धोरण 'भारता'तली शेती व शेतकऱ्यांचे शोषण करून 'इंडिया'तल्या शहरी-मध्यमवर्ग-नवश्रीमंत-अतिश्रीमंत लोकसंख्येच्या हिताची काळजी वाहणारं आहे, कारखानदारीला स्वस्तात कच्चा माल मिळावा यासाठी शेतीमालाला उत्पादनखर्चाइतकाही रास्त भाव न देणं, हा या धोरणाचाच भाग आहे- अशी नेहरूंच्या कामगिरीची चिरफाड शरद जोशींनी केली. नेहरूंच्या 'या' वारशावर मोदींना थोडाफार हक्क जरूर सांगता येईल, कारण मोदीही तोंडाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू असं बोलत असले, तरी त्यांची प्रत्यक्ष कृती मात्र शेतकऱ्यांच्या मानेवर सुरी फिरवणारी आहे.

शेती हा दहा तोंडांचा राक्षस आहे. त्यात निसर्ग, बाजार आणि सरकार यांच्याशी शेतकऱ्याला एकाच वेळी झुंज द्यावी लागत आहे. अशा स्थितीत शहरी ग्राहकांना मधाचं आणि शेतकऱ्यांना मात्र चुन्याचं बोट लावण्याच्या धोरणात तसूभरही बदल न करता शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची भाषा करणं म्हणजे- 'दिल बहेलाने के लिये गालिब खयाल अच्छा है!'

**रमेश जाधव**, पुणे
ramesh.jadhav@gmail.com
Mob. : 9922913192


Date of Publication - 9-11-2017

थेट सभागृहातून

रंगनाथ पठारे

# विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषण

आजच्या या अशा वर्तमानात लेखकांनी काय करावे, असे मी काहीही म्हणालेलो नाहीय. कारण लेखकांना कोणी आदेश द्यावा आणि त्यांनी तो तंतोतंत पाळावा, अशा मताचा मी नाहीये. आपल्या वर्तमानाला प्रतिक्रिया देण्याची प्रत्येक लेखकाची रीत वेगळी असते. त्यांच्या त्या विविध रीतींचा मी आदर करतो. त्यांच्या व्यक्त होण्याच्या स्वातंत्र्याचा मी आदर करतो. त्यांनी त्यांचे ते स्वातंत्र्य जपावे; त्यासाठी पडेल त्या त्यागाची तयारी ठेवावी, हे मात्र मी अवश्य म्हणेन. आजच्या आदेश देणाऱ्या, भय निर्माण करणाऱ्या या काळात आपल्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य टिकविणे, आपला स्वर-आपले नीतिधैर्य टिकवून प्रकट करणे फार महत्त्वाचे झालेले आहे.

मित्रहो!

या निमित्ताने आपल्यासमोर काही विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी संयोजकांचे आभार मानतो. संयोजक म्हणताना मला श्री. जयंत येलुलकर, त्यांचे सहकारी आणि पुण्याच्या म.सा.प.चे पदाधिकारी यांचा निर्देश करावयाचा आहे. त्यांना पृष्ठदर्शी प्रतिकूल वाटतील अशा माझ्या काही प्रतिक्रया अनेक बाबतींत त्यांच्यासंबंधी आणि त्याचा संबंध असलेल्या अनेक उपक्रमासंबंधी जाहीर असताना त्यांनी मला या ठिकाणी बोलावले आहे, म्हणून मी त्यांचा आभारी आहे. मी जे काही बोलत असतो, त्याच्यापाठी मला आपल्या भाषा व संस्कृतीविषयी वाटणारा जिव्हाळा कारक असतो याची सत्यता त्यांना जाणवलेली आहे, असा याचा मी अर्थ घेतो. आपल्या अहमदनगर जिल्ह्याशी मी माझ्या जन्मापासूनच बांधला गेलेलो आहे याचा मला फार अभिमान वाटतो. याच जिल्ह्यातल्या पारनेर तालुक्यातील जवळे नावाच्या गावात माझा जन्म झाला. जवळे, अहमदनगर आणि पुणे इथे मी शिकलो. संगमनेर इथल्या एका महाविद्यालयात सदतीस वर्षे काम केले. माझ्या आयुष्याचा बव्हंशी सगळा काळ मी या जिल्ह्यातच घालविला आहे. माझ्या लेखनाचे सारे सत्त्व याच भूमीने मला पुरविलेले आहे. ख्रिस्ती मिशनरी लोकांनी अत्यंत सेवाभावी वृत्तीने चालविलेल्या अहमदनगर महाविद्यालयात मी शिक्षण घेतले आहे. धर्मप्रसारापेक्षा ‘शहाणे करुनी सोडावे सकल जन’ या व्रताचा अंगीकार केलेल्या त्या महाविद्यालयाने या जिल्ह्यातील आणि आसपासच्या मराठवाड्यातील अनेक बहुजन विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडविलेल्या आहेत. आयुष्यभर पुरून उरावे असे सांस्कृतिक संचित त्या महाविद्यालयाने माझ्यासारख्या अनेकांना पुरविलेले आहे. शैव साधक, नाथसंप्रदायी संत, महानुभावी महात्मे यांच्या निवासाने आणि कार्याने ही भूमी पावन झालेली आहे. संत ज्ञानेश्वरांपासून शेख महंमद निळोबाराय पिंपळनेरकर ते सकलसंतगाथा लिहिणारे महिपतीबुवा ताहराबादकर यांच्यापर्यंत अनेक महानुभाव इथे होऊन गेलेले आहेत. तशीच कवी अनंत फंदी यांच्यापासून ते सेनापती बापट अशी आणि यांच्यासारखी अनेक नावे सांगता येतील. दोन हजार वर्षांआधी संपूर्ण भरतखंडावर जवळपास सलग चारशे वर्षे राज्य करणाऱ्या सातवाहन या महाराष्ट्री राजकुलानंतर महाराष्ट्री लोकांना दीर्घ स्मृतिभ्रंशाने ग्रासलेले होते. औरंगाबादजवळच्या वेरूळ येथील पाटलांच्या घराण्यात जन्मलेल्या छत्रपती शिवाजीराजाने आपल्याला त्यातून जागे केले. या राजासाठी तशी भूमी तयार करण्याचे


Date of Publication - 9-11-2017



महत्त्वाचे काम मलिक अंबर या अहमदनगर येथील निजामशाही राजवटीतील एका सरदाराने केले. मलिक अंबर हा हबशी गुलाम. हबशी म्हणजे ॲबिसिनिया देशातला. हल्लीच्या इथिओपियामधला. स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर तो गुलामीतून मुक्त होऊन सरदार झाला होता. याने मराठा सरदारांमध्ये एकजूट व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शहाजी आणि जिजाबाई यांचे लग्न होण्यासाठी– भोसले आणि जाधव यांच्यात सोयरिक होण्यासाठी– त्याने मर्यादातिक्रम करून प्रयत्न केले. गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचा पाया यानेच घातला. त्याचा छत्रपती शिवाजीराजाने नंतर खूप विस्तार केला. अहमदनगरच्या या हबशी गुलाम सरदाराने आपल्यातले मराठीपण जागे केले. आपल्याला आपल्यातल्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. आपला स्मृतिभ्रंश नाहीसा केला; तो होण्यासाठीचा पाया घातला, ही फार मोठी गोष्ट आहे. या ॲबिसिनियन किंवा इथिओपियन लोकांशी असलेला आपला संपर्क अधिक जुना बराच प्राचीन असला पाहिजे, असे मला वाटते. अजिंठा येथील चित्रातील स्त्रिया आपण जवळून जरा बारकाईने पाहिल्या, तर त्या आजच्या इथिओपियन स्त्रियांसारख्या सुंदर व चेहऱ्याची ठेवण तशीच असलेल्या दिसतात. तेव्हाचे काही कलाकार इथिओपियन होते की काय याचा शोध तज्ज्ञांनी घ्यावा, इतके ते साहजिक वाटण्याजोगे आहे. नगर जिल्ह्याच्या आणखी एका वैशिष्ट्याची नोंद घेणे मला आवश्यक वाटते. त्याचा संबंध इथल्या लोकांच्या सहकारी वृत्तीशी आहे, तसाच तो शिक्षणासंबंधीच्या अनिवार आस्थेशी आहे आणि तो आपल्या लोकांच्या लढाऊ वृत्तीशीसुद्धा आहे. महाराष्ट्रातील आधुनिक सहकारी साखर कारखानदारीचा पाया पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांनी लोणी येथे साखर कारखाना करून घातला, हे सर्वश्रुत आहे. ते नुसत्या साखर कारखानदारीवर थांबले नाहीत, जीवनाच्या सगळ्या क्षेत्रांत या वृत्तीने शिरकाव केला. ही चळवळ फोफावली. तिच्यात आज शिरलेल्या काही अनिष्ट प्रवृत्तींसकट ही महाराष्ट्राच्या जीवनात परिवर्तन घडविणारी मोठी चळवळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जनसामान्यांच्या शिक्षणासाठी सातारा जिल्ह्यात सुरू


Date of Publication - 9-11-2017

केलेल्या कार्याला तिथल्यापेक्षा खूप अधिक प्रतिसाद अगदी पुणे जिल्हा ओलांडून आपल्या नगर जिल्ह्याने दिला. जनसामान्यांच्या कल्याणाच्या गोष्टी करणाऱ्या सगळ्या डाव्या चळवळींना इथे नेहमीच वाव मिळाला. हे सगळे असे का आहे; याचे मूळ कशात आहे; या जिल्ह्यातल्या लोकांत हे कुठून आले, हा एक सामान्य माणूस म्हणून मला कायमच पडलेला प्रश्न होता. याचे- निदानपक्षी अंशतः तरी- उत्तर मला या जिल्ह्याचे गॅझेटियर वाचताना दिसले. त्यातल्या काही नोंदी अशा-

१८०२ मध्ये होळकरांच्या सैन्याने नगर जिल्हा बेचिराख करून टाकला होता. १८०३-०४ या वर्षात भयंकर दुष्काळ पडला. लोक घरेदारे सोडून गेले. गावे ओस पडली. काही लोक मोठ्या गावांमधल्या किल्ल्यांमध्ये आश्रयाला जात. अहमदनगरच्या किल्ल्याभोवती खंदक खोदण्याच्या कामाला जनरल वेलस्ली याने या वेळी सुमारे ५००० पेक्षा जास्त मजूर लावलेले होते. भिल्ल व तत्सम रानटी लोक मैदानी भागात येऊन अतोनात लूट व क्रूर कृत्ये करीत. पेंढाऱ्यांचे हल्लेही वाढले होते. भिल्लांच्या बंदोबस्तासाठी आधी दुसऱ्या बाजीरावाने खानदेशाचा सुभेदार बाळाजी लक्ष्मण याची योजना केली होती. मनोहरगीर गोसावी या आपल्या माणसामार्फत त्याने असंख्य भिल्लांना कोपरगाव येथे गोदावरीकाठी बोलावले आणि त्यांची निर्घृणपणे हत्या करून ती प्रेते विहिरींमध्ये टाकली. त्यामुळे काही काळ बंदोबस्त झाला. पुन्हा १८०६ मध्ये तशीच बेशिस्त आणि गोंधळ चालू राहिला. त्र्यंबकजी डेंगळे याने शेवगाव तालुक्यातील घेवडी-चांदगाव येथे पुन्हा एकदा असाच भिल्लांच्या सामुदायिक हत्येचा कार्यक्रम घडवून आणला. त्यासाठी त्याने नारोबा पाटील नामक इसमाची योजना केली. पाच ते सहा हजार घोडी व बरेच मोठे पायदल त्याच्या दिमतीला देण्यात आले होते. दिसतील ते भिल्ल आणि तत्सम यांची नारोबाने सर्रास कत्तल उडवली. पंधरा महिन्यांत सुमारे पंधरा हजार माणसे कापली गेली, असे म्हणतात. अहमदनगरच्या दक्षिणेकडचा काही सुपीक पट्टा सोडता, बाकी सारीकडे निर्जन गावे सुमारे १८१८ पर्यंत होती. पेशव्याच्या फौजेचा १८१८ मध्ये सेवनी येथे पराभव झाला. तेव्हा पेशव्यांच्या फौजेतील अनेक पराभूत घोडेस्वार योद्धे अहमदनगर जिल्ह्यातल्या निर्जन मुलखात येऊन वसती करू लागले. ही गोष्ट त्या वेळचा अहमदनगर येथील कलेक्टर लेफ्टनंट हेन्री पॉटिंजर म्हणून जो होता- त्याने तेव्हाचा दख्खनचा कमिशनर एल्फिन्स्टन याला कळवली आणि सूचना मागवल्या. त्यावर एल्फिन्स्टन याने त्यास कळवले की, पॉटिंजर याने अशा लोकांना उत्तेजन द्यावे व चांगली वागणूक द्यावी. त्याप्रमाणे पॉटिंजर याने व्यवस्था केली. पॉटिंजर हा एल्फिन्स्टन याचा मित्र आणि त्याच्या विश्वासातला होता. तो १८२५ पर्यंत कलेक्टर होता.

दि.१९ ऑगस्ट १८२१ : अहमदनगरच्या जेलमधील कैद्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर हल्ला करून त्यांची हत्यारे हस्तगत केली. काही कैदी पळून गेले. बाकीच्यांनी किल्ला बंद करून फौज येईपर्यंत तो लढवला. फौजेने केलेल्या हल्ल्यात २९ कैदी मारले गेले, ६२ जखमी झाले. नंतर शांतता प्रस्थापित झाली.

दि.१९ ऑगस्ट १८२२ : सांगलीचे संस्थानिक चिंतामणराव पटवर्धन यांचा सेवक नरसिंगराव याच्या जबानीवरून शिबंदी जमा करण्याचा एक कट उघडकीस आला. शिंदे यांची गावे- बेलापूर, सोनई, ब्राह्मणी जामगाव आणि नंदुरबार (खानदेश) येथे ही शिबंदी जमविण्यात येणार होती. जी नंतर लासूर येथे एकत्र येणार होती, खेरीज, हिंदुस्तानच्या अनेक भागांत आणखी कुमक गोळा केली जाणार होती. ती घेऊन ब्रिटिश ठाण्यांवर हल्ले करण्याची त्यांची योजना होती.

अशाच आणखी पुष्कळ नोंदी रामजी भांगरे, गोविंदराव खाडी, राघोजी भांगरे, भागोजी नाईक या अकोले तालुक्यातील कोळी योद्ध्यांसंबंधी आहेत. १८७५ मध्ये पारनेर-कर्जत-श्रीगोंदे आणि नगर भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी सावकारांवर झुंडीने हल्ले केल्याच्या २२ घटना घडल्या. त्या वेळी त्या भागातील ब्राह्मण कुलकर्णी यांनी ब्रिटिशांना सल्ला दिला होता की, या बंडखोर शेतकऱ्यांवर सैन्य पाठविण्यापेक्षा त्यांच्या मागण्यांकडे, त्यांच्या हाल-अपेष्टा संपविण्याकडे ब्रिटिशांनी लक्ष द्यावे.

यातून या जिल्ह्यातल्या लोकांविषयी काही गोष्टी स्पष्ट होतात. हे लोक प्रामुख्याने फौजी लोकांचे वंशज आहेत. ते अठरा पगड जातींतले आहेत. ते महाराष्ट्राच्या आणि कदाचित देशाच्या अनेक भागांतून आलेले आहेत. ते योद्धे होते, म्हणून त्यांच्यात काहीएक शिस्त होती. इथल्या सहकाराचा उगम त्यात आहे. ते दुनिया हिंडलेले होते. त्यांची नजर उघडी झालेली होती. ही गोष्ट त्यांच्या शिक्षणाच्या आस्थेविषयीचे स्पष्टीकरण देते. त्यांची लढाऊ वृत्ती कधीच संपली नाही. अन्यायाचा प्राणपणाने प्रतिकार


Date of Publication - 9-11-2017

करणे त्यांच्या स्वभावात होते आणि आहे. असो. अशा अनेक गोष्टींसाठी मी या लोकांत जन्मलो याचा मला अभिमान वाटतो.

आता नगर जिल्ह्यातून बाहेर– साहित्य आणि संस्कृतीकडे.

साहित्याच्या साऱ्या गोष्टी भाषा–संस्कृती यांच्याशी आणि त्यांच्या वर्तमानाशी संबंधित असतात. म्हणूनच त्या आपल्या व्यक्तिगत आणि सामूहिक जगण्याच्या व्यापक घडामोडींचा भागही असतात. म्हणजे एक व्यक्ती म्हणून– आणि समूह म्हणूनही– आपले आजचे जे वर्तमान आहे, ते या ना त्या प्रकारे साहित्याच्या निर्मितीस कारण होत असते. म्हणूनच वर्तमानाचे अस्सल भान ठेवणे आणि किमान मनातल्या मनात तरी त्याला प्रतिक्रिया देत राहणे, ही साहित्याच्या निर्मितीची अगदी प्राथमिक अट आहे. कारण साहित्याची निर्मिती ही जगण्याच्या प्रक्रियेला प्रतिक्रिया देण्याच्या ज्या अनेक रीती असतात, त्यांतील एक मौल्यवान रीत असते. तिची मौलिकता ही अनुभवाचे आंतरिकीकरण करण्याची क्षमता, व्यक्त होण्याची असोशी, दंश करवून घेण्याची रीत अशा आणि यांसारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते. हल्ली पुष्कळ ज्ञानी लोक असे म्हणू लागले आहेत की– अहो, साहित्य आता post-modern झालेय अन् तुम्ही ह्या कसल्या दंश वगैरेच्या गोष्टी करताय? आता साहित्य पोस्टमॉडर्न होण्यासाठी एक भाषिक समाज म्हणून आपण तसे होणे आवश्यक आहे, हे तर ज्ञानी लोकसुद्धा मान्य करतील. जिथे आपण पुरेसे मॉडर्नसुद्धा अजून नीट झालेलो नाही, तिथे ह्या पोस्टमॉडर्नच्या बाता फिजुल आहेत, असे मी मानतो. अन् तसे झालेले लोक हे अधिक पुढारलेले आहेत असे मानणेसुद्धा भ्रम ठरू शकते, असे मला वाटते. अगदी ज्ञानी लोकांचे म्हणणे खरे मानायचे ठरले, तरी लेखकासाठी ही दंशाची गोष्ट कायमच आवश्यक राहते, हे लक्षात घेतले पाहिजे. आधुनिकता आणि उत्तर आधुनिकता यांच्या पल्याडची ती स्वतंत्र अशी गोष्ट आहे. आपल्या वर्तमानाविषयीची सजगता संपली की लेखक संपतो. त्या स्थितीत तो लिहायला उद्युक्त कसा होणार? अन् त्याने लिहिले, तरी ते मौलिक होण्याच्या शक्यतेपासून कोसो दूरच राहणार यात काय तो संशय! एक लेखक म्हणून माझ्या वर्तमानातील झळांची उकल करण्यासाठी गरज पडली तर मी काळात अवश्य मागे–पुढे जाईन; पण झळांचे मूळ तर माझ्या वर्तमानातच असते ना! आणि कोणतेही अर्थपूर्ण व घनसर लेखन करताना लेखकाला/कवीला काहीएक जोखीम पत्करावीच लागत असते. मी आपल्याला पाश नावाच्या पंजाबमधल्या कवीचे उदाहरण देतो. 'सबसे खतरनाक होता है सपनोंका मर जाना...' अशा ओळी लिहिणाऱ्या आणि आपली भारतीयता हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या या कवीला मारण्याचा त्या काळातील खलिस्तानी मंडळींनी चंग बांधलेला होता. या कवीला मरण्याची बिलकुल इच्छा नव्हती. जिवंत राहून आपल्याला जे म्हणायचे आहे, ते म्हणण्याचा लोकशाहीतील निसर्गदत्त अधिकार त्याला बजावयाचा होता. पण आपले म्हणणे मांडत असताना प्रत्यक्ष जीवनात जगण्यासाठी त्याला खूप पळापळ करावी लागली होती. देश–विदेशात राहावे लागले होते. तो भेकड नव्हता, कारण तसे करताना दहशतीच्या त्याही स्थितीत तो आपले म्हणणे सोडत नव्हता. अखेर खलिस्तानी लोकांनी त्याला पाळत ठेवून टार्गेट करून मारले. त्यातून त्याला स्वतःला वाचविता आले नाही. जगण्यातील झळांचा दंश या प्रकारे मरणाला सामोरे जाण्याची जोखीम पत्करण्याचे बळ लिहिणाऱ्याला देत असतो. एक लिहिणारा म्हणून त्याचे मूल्य माझ्यासाठी असाधारण आहे.

म्हणूनच, माझे आजचे वर्तमान कसे आहे याचा धांडोळा घेणे मला आवश्यक वाटते. ज्याला मी माझे वर्तमान म्हणतो, ते माझे–तुमचे– आपल्या सगळ्यांचे– वर्तमान असण्याची शक्यता आहे. किंवा मी मांडतो ते प्रश्न आपल्यापैकी अनेकांचे प्रश्न असू शकतात. माझ्या वर्तमानात माझे समानधर्मा तत्त्वतः लाखो–करोडो असू शकतात. त्यांच्या तसे असण्याचा मला फार आधार वाटतो. मी ह्या आधार वगैरेच्या गोष्टी करतो म्हणजे मी घाबरलेलो आहे, असे कदाचित आपणास वाटत असेल. मला असे वाटते की, मी घाबरलेलो नाहीय. पण मला चिंता वाटते, मला काळजी वाटते. काही काळाआधी अशा लोकांना 'चिंतातूर जंतू' म्हणण्याचा प्रघात होता. मी त्या प्रकारचा माणूस आहे, असे मला वाटत नाही. हे असे beating around the bush करण्यापेक्षा मी स्पष्ट शब्दांत थेट ते मांडतो. माझ्या देशाच्या लोकशाही परंपरेवर माझा भरवसा आहे. आधुनिक काळातली लोकशाही येण्याच्या आधीसुद्धा आपल्या इथे लोकांचे काय म्हणणे आहे हे जाणून घेण्याची प्रथा दीर्घ काळ होती. म्हणूनच लोकशाही ही आपल्यासाठी काही नवी गोष्ट नाहीय आणि तिला चिरडण्याच्या गोष्टीदेखील आपल्याला नव्या नाहीत. त्या

सगळ्यांना पुरून उरलेले लोक आपण आहोत याचा मला फार अभिमान वाटतो. आपण कायमच प्रश्न उपस्थित करणारे लोक राहिलेलो आहोत, आपल्या अशा वृत्तीचा आपल्या सामाजिक व्यवस्थेने सहसा पुरस्कारच केलेला आहे. जेव्हा ते आपल्याला जमले नाही, तेव्हा इथल्या भद्र वर्गाचे हितसंबंध राखण्यासाठी त्या भद्र लोकांनी परकीयांना आमंत्रण दिलेले आहे आणि त्यांना इथे राज्य करता यावे अशा सोई प्रदान केलेल्या आहेत. आधुनिक काळात महात्मा गांधींचा उदय होण्याच्या आधीपर्यंत अगदी दीर्घ काळ आपण एक प्रकारे एका स्मृतिभ्रंशात जगत होतो. गांधीजींनी आपल्याला एक समूह म्हणून प्रश्न विचारणे पुन्हा शिकवले. किंवा, मुळात आपल्यात जे होते, त्याचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. मी 'आपल्याला' म्हणताना आपल्या सामान्य माणसांविषयी बोलतो आहे, जो आपल्या अस्तित्वाचा कष्टकरी कणा आहे. आधुनिक काळात गांधीजींनी सामान्य माणसाला घडामोडींच्या केंद्रस्थानी आणून उभे केले. आणि सांगितले की- बाबा, जे काही चालले आहे ते हे-हे आणि असे-असे आहे. तुला त्याबद्दल जे काय म्हणायचे, ते म्हण. आपला सामान्य माणूस त्याला जे बोलायचे, ते-ते बोलला. आपले व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य हा आपल्यातल्या या श्रेष्ठ लोकशाही मूल्याचा परिपाक आहे. याच्या बळावर एक भारतीय बहुभाषी समूह म्हणून आपण नुसताच तग धरलेला नाही, तर अनेक अंगांनी आपला भौतिक, भावनिक व मानसिक विकास केलेला आहे. सगळ्या प्रकारच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मुबलक उपलब्ध असल्याने अनेक कल्याणकारी संस्थांची उभारणी आणि विकास आपण करू शकलो आहोत. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या एवढ्या वर्षांत या आपल्या silent majority ने आपल्याला काय हवे ते फार जबाबदारीने कायमच सांगितलेले आहे. आणि जे व्हायला हवे, ते करण्यासाठी याच लोकांनी त्याच प्रकारे- म्हणजे मागे-मागे राहून विनातक्रार कष्ट करत- फार त्याग केलेला आहे. औपचरिक शिक्षणाचा अभाव असण्याच्या काळात आपल्या जनसामान्यांनी ते केले आहे, हे मला एक भारतीय म्हणून अभिमानास्पद वाटते.

या पार्श्वभूमीवर आपले आजचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वर्तमान कसे आहे? अगदी एका वाक्यात सांगायचे तर- ते भय निर्माण करणारे आहे. असे बघा- नरेंद्र मोदी या देशाचे पंतप्रधान झाले आहेत, याला माझा आक्षेप नाही. आपल्या ज्या काही बऱ्या-वाईट असेल, त्या लोकशाही व्यवस्थेने त्यांना त्या जागी बसविलेले आहे. ज्या प्रकारच्या विचारधारेचा ते पुरस्कार करतात, ती मला मान्य नाही. विचारांच्या अंगाने मी तिच्या दुसऱ्या टोकावर उभा आहे. पण माझ्या देशाच्या लोकशाही व्यवस्थेने त्यांना शीर्षस्थानी आणलेले आहे, तर त्याचा एक नागरिक म्हणून मी आदरच केला पाहिजे आणि तो मी करतो. या देशात लोकशाही आहे म्हणूनच एक तेली किंवा त्यासदृश जातीतील मनुष्य शीर्षस्थानी जाऊ शकलेला आहे, ही आपल्याला अभिमान वाटावी अशीच गोष्ट आहे. पण म्हणून ते जे करीत आहेत किंवा त्यांच्या या कारकिर्दीत जे घडते आहे, त्याच्याविषयी प्रश्न करण्याचा माझा अधिकार गमाविण्याची माझी तयारी नाही. आपल्यापेक्षा वेगळे मत असलेल्या इसमाला नेल्सन मंडेला एकदा म्हणाले होते, ''तुझे म्हणणे भले मला मान्य नसेल, पण ते मांडण्याच्या तुझ्या अधिकाराचा मी प्राणपणाने पुरस्कार करतो.'' लोकशाहीत या प्रकारे विविध स्वरांना मुक्तपणे व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य अपेक्षितच असते. असे या प्रकारचे आपले स्वातंत्र्य आज प्रश्नांकित झाले आहे. किंवा खरे तर ते धोक्यातच आले आहे, असे दिसते. अगदी पारतंत्र्याच्या काळातसुद्धा बाळ गंगाधर टिळक हे 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असे शीर्षक असलेला लेख 'केसरी'मध्ये लिहू शकत होते. आज आपल्या सगळ्या प्रकारच्या प्रसारमाध्यमांनी सत्ताधारी सरकारपुढे नांगी टाकलेली आहे. दादरी येथे काय झाले, हे आपल्याला माहीत आहे. अशाच प्रकारच्या अनेक गोष्टी किंवा घटना राजस्थान, उत्तर प्रदेश आणि इतरत्र भरपूर झालेल्या आहेत. (महाराष्ट्र याला अपवाद आहे असे नाही. अगदी आपला पुरोगामी म्हणविला जाणारा नगर जिल्हाही त्याला अपवाद नाही. आपल्या जिल्ह्यातील कोणत्याही राज्यकर्त्याने इथे झालेल्या अनेक घटनांचा जाहीर निषेध केल्याचे माझ्या ऐकिवात नाही.) अशा घटना घडून गेल्यावर खूप उशिरा पंतप्रधान त्यांचा गुळमुळीत निषेध करतात. कायदा हातात घेतलेल्या लोकांना शासन करण्यासाठी पावले उचलली जात नाहीत. अगदी अलीकडे गुजरातमध्ये एक दलित मुलगा गरबा बघायला गेला, म्हणून त्याला काही सवर्णांनी ठार केले आहे. आणखी एका दलित मुलाला तो मिशा ठेवतो म्हणून धमकावण्यात आले आहे, मारण्यात आलेले आहे. आता मिशा राखणे ही कोणत्याही जातीची मिरासदारी नाहीय. आपले रानडे-गोखले-टिळक-आगरकर मिशा ठेवत होते. हल्ली रामोशी, बेरड आणि


Date of Publication - 9-11-2017

तत्सम जातीचे लोक मिशा ठेवतात. बाकी आपल्या मराठ्यांसकट सगळे श्मश्रू ठेवून गुळगुळीत राहण्यात धन्यता मानतात. तो समजा ज्याचा-त्याचा प्रश्न. पण गरिबाने मिशा ठेवण्याची हौस केली, तर त्याला कायदा हातात घेऊन झुंडीने मृत्युदंड द्यायचा- याला काय म्हणायचे? आज दलित आणि मुस्लिम यांना टार्गेट करून धमकावण्याच्या आणि मारण्याच्या घटना वाढत आहेत. हे आधीच्या काँग्रेस राजवटीत घडत नव्हते, असे मला म्हणायचे नाहीय. फरक एक आहे की, असे करणाऱ्या लोकांचा आत्मविश्वास आता फार वाढला आहे. आपला पक्ष आता सत्तेत आहे आणि बाकी कोणीही आपल्याला काहीही करू शकत नाही, असा काही लोकांचा समज झालेला आहे. तो दूर करण्यासाठी पंतप्रधान खूप उशिरा काही दुबळ्या औपचारिक गोष्टी बोलतात; पण बोलतातच फक्त. त्याला हिंग लावूनसुद्धा किंमत द्यायची नाही, त्याची आवश्यकता नाही- असा कायदा हातात घेणाऱ्या लोकांचा समज होतो आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये अलीकडच्या काळात ज्या कार्यकर्त्यांच्या हत्या झालेल्या आहेत, त्यांचा तपास दीर्घ काळ गेला तरी लागत नाही; हे काय आहे? भालचंद्र नेमाडे हे आपल्या भाषेतले आणि आपल्या देशातले एक श्रेष्ठ लेखक आहेत. त्यांचे ज्ञानपीठ पुरस्कारविजेते असणे हा या वास्तवाचा एक छोटा अनुषंग आहे, असे मी मानतो. त्यांना दिल्या गेलेल्या धमक्या आणि त्याच्या परिणामी त्यांना सोसावा लागलेला भावनिक व मानसिक ताप यांचा तर मी स्वतः साक्षी होतो आणि आहे. सरकारी, निम-सरकारी आणि सरकारपुरस्कृत असूनही कायदा करून स्वायत्त ठेवलेल्या अनेक साहित्य आणि संस्कृतीविषयक संस्था यांच्या कामात आजचे सरकार ज्या अमानुष अडाणीपणे हस्तक्षेप करत आहे, ते अत्यंत धोकादायक आहे. इतिहासाची मांडणी आणि त्याचे वाचन यांच्यामध्ये याच प्रकारचा हस्तक्षेप होतो आहे. शेजारी पाकिस्तान देशात इतिहासाची मूर्ख मांडणी करताना ते, मुहम्मद बिन कासीम इसवी सनाच्या सातव्या शतकात इकडे आला तेव्हापासून पाकिस्तान हा देश निर्माण झाला, असे अभ्यासक्रमाच्या पुस्तकात सांगतात. १९४७ पर्यंत भारत हा पाकिस्तानचा भाग होता, असे सांगतात. आपण आज ज्या प्रकारे इतिहासात हस्तक्षेप करू बघत आहोत, ते यापेक्षा फार वेगळे नाहीय. कारण ऐतिहासिक वास्तवापेक्षा काही एक धारणा बाळगणाऱ्या वर्गाला सोईचा वाटणारा 'सिलेक्टिव्ह' इतिहास आपण आपल्या पाठ्यपुस्तकात टाकण्याचा प्रयत्न करत आहोत. भारत नावाचे जे एक बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक वास्तव आहे, त्याच्यात इतिहासाची अशी परंपरा नाहीय. 'आधी हा जय नावाचा इतिहास आहे' असे नाव असलेल्या आणि नंतर 'महाभारत' या नावाने रूढ झालेल्या सगळ्या भरतखंडाला अनेक पिढ्या बांधून ठेवणाऱ्या महाकाव्यातसुद्धा बऱ्या-वाईट, सुष्ट आणि दुष्ट अशा सगळ्या मांडणीत अर्थांचे व मूल्यनिर्णयाचे सगळे पदर खुले राहतील अशी काळजी घेण्यात आलेली आहे. पांडव सुष्ट आणि कौरव दुष्ट अशी वरवर मांडणी असली, तरी कौरवांच्या बाजूने विचार करता त्यांचे काहीही चुकलेले नाहीय. दुर्योधनाचे म्हणणे त्याच्या अंगाने विचार केला, तर पटू शकेल असेच आहे, अशी खुली मांडणी आहे. आणि पांडवांनी मिळविलेले सगळे विजय धर्मयुद्धाचे नियम उल्लंघून मिळविलेले आहेत, असे प्रतिपादन करायला वाव आहे. 'इतिहास हा जेत्याच्या बाजूचा आहे' असे म्हणता-म्हणता तो अत्यंत संयत प्रकारे कोणाचीही बाजू न घेता मांडण्याचा आदर्श व्यासांनी या महाकाव्यात आपल्याला घालून दिलेला आहे. अर्थनिर्णयन त्यांनी वाचकांवर सोडलेले आहे. आपल्यामधली संयत आणि समंजस दृष्टी यांचा पाया या महाकाव्याने घातलेला आहे, असे म्हणणे फार चुकीचे होणार नाही. पण आज आपण तिथून एका वेगळ्या अडाणी आणि अत्यंत चुकीच्या दिशेने जाऊ पाहत आहोत, हे सांगण्याची वेळ आलेली आहे. जी गोष्ट भौतिक इतिहासाची ती किंवा तशीच आपल्या वैज्ञानिक इतिहासाच्या मांडणीची आहे. आज दुनियेत विज्ञानात जे-जे ज्ञान उपलब्ध आहे किंवा मांडले जातेय, ते सारे आपल्या पूर्वजांना आधीच माहीत होते किंवा ते त्यांनी आधीच शोधलेले होते- अशा प्रकारची मांडणी आपण करत आहोत. विमानापासून ते अनेक ग्रहांचा आणि त्यांच्या असण्याचा शोध घेऊ पाहणाऱ्या मानवनिर्मित उपग्रहांच्या वास्तवासंबंधी 'हे आपल्याकडे आधीच होऊन गेलेलं आहे' अशी आत्मतुष्टी करणारी मांडणी होत आहे. एक समाज म्हणून दीर्घ काळ ज्या अंधारात आपण जगलो आहोत त्याच्या वास्तवाकडे आणि त्याच्या कारणांकडे ही मांडणी सोईस्कर दुर्लक्ष करते. ती आपल्याला एक समाज म्हणून पुन्हा अंधाराकडे नेणारी आहे. दुनिया कशी बदलत आहे आणि ती कोणत्या दिशेने चालली आहे याचा विचार


Date of Publication - 9-11-2017

आपण करत नाही. ती गोष्ट आपल्याला तितकी तातडीची वाटत नाही.

दुनिया फार वेगाने बदलत आहे. मानवी कुतूहलाचा बौद्धिक प्रवास असाधारण कल्याणकारी दिशेने जात आहे. अगदी अलीकडे माझ्या वाचनात आले आहे की, फिनलँडमधल्या एका विद्यापीठातील संशोधकांच्या एका गटाने कार्बन आणि वीज यांचा वापर करून प्रथिने निर्माण करण्यात यश मिळवले आहे. अन्ननिर्मितीच्या दृष्टीने ही क्रांतिकारी घटना आहे. हवेतील हायड्रोजनचा इंधन म्हणून वापर करून वाहने चालवायची आणि बायप्रॉडक्ट हे शुद्ध पेयजल असेल- अशा संशोधनाच्या गोष्टी अंतिम टप्प्यात आलेल्या आहेत. मानवी प्रजातीला सुखाने जगता येईल अशा किती तरी गोष्टी जगभर चाललेल्या आधुनिक संशोधनात स्पष्ट होत आहेत. आपल्याला उपलब्ध असलेले किंवा होऊ शकणारे अन्न, पाणी आणि हवा आपणास उत्तम व मुबलक मिळेल अशा दिशेने हे संशोधनाचे काम चाललेले आहे. याच वेळी या पृथ्वीतलावरील एक प्रजाती म्हणून एकमेकांना किंवा आपल्या सगळ्यांना संपविण्याच्या गोष्टी आपण करत आहोत. अफगाणिस्तान, सिरिया, युक्रेनमधला क्रिमिया, इराण आणि सौदी अरेबिया, उत्तर कोरिया, चिनी समुद्र अशा कुठेही ठिणगी पडू शकते. ती ठिणगी एक प्रजाती म्हणून आपल्या अस्तित्वाची राखरांगोळी करू शकते. असे म्हणताना या पृथ्वीवरील आपण सारे मनुष्य एक प्रजाती आहोत, असे मी गृहीत धरलेले आहे. या प्रकारचे गृहीतक आता धोक्यात आलेले आहे. काही लोक आणि काही देश आपले नागरिक वगळता इतर लोक म्हणजे बाकीचे सगळे lesser human beings आहेत, अशा अघोषित धारणा मनाशी बाळगत जगत आहेत. या सगळ्यात कधी काय होईल आणि मानवी प्रजातीचे भविष्य काय असेल, हे सांगणे मुश्कील; जवळपास अशक्यच झालेले आहे.

जगाच्या व्यवहारात त्या पटलावर कसे वागायचे आणि काय करायचे हे ठरविताना, एक बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक भौगोलिक वास्तव म्हणून आपल्या देशबांधवांत जो भ्रातृभाव आहे त्याचे पुनःजागरण करण्याची फार आवशकता आहे. एकमेकांना सहन करण्याची, सहिष्णु असण्याची आपल्याला दीर्घ परंपरा आहे. अमेरिका जशी अमेरिकन लोकांची, ब्रिटन हे ब्रिटिशांचे- तसा हिंदुस्तान हिंदूंचा- असे म्हणणे या देशात राहणाऱ्या इतर धर्म-पंथ आणि श्रद्धा बाळगणाऱ्या नागरिकांचा अपमान करणारे आहे. असे म्हणणारे त्यांना सोईचे म्हणून या देशाला हिंदुस्तान म्हणतात. ते ‘भारत हा भारतीयांचा’ असे नाही म्हणत. भारताला हिंदुस्तान म्हणण्याला माझा आक्षेप नाही. पण भारतात फक्त हिंदू लोक राहत नाहीत. मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, शीख, जैन अशा अनेक धार्मिक श्रद्धा बाळगणारे लोक या देशाचे नागरिक आहेत. आणि हिंदू म्हणून तरी आपण कुठे एकसंध आहोत? प्रचंड मोठ्या संख्येने आपल्यात असलेल्या विविध दलित जातींना आपण आपल्या अंतःकरणापासून आपल्या बरोबरीचे कुठे मानत आहोत? की, ते फक्त आपली टक्केवारी वाढविण्यासाठी हिंदू? अनेक जाती, अनेक प्रथा, अनेक भाषा- अशी किती तरी वेगवेगळी ओळख सांगणाऱ्या गोष्टी आपल्यात आहेत. त्या सगळ्या आपल्याला अभिमान वाटावा अशा आहेत, असे म्हणता येणार नाही. जगात सगळीकडे असेच असते. अमेरिका अमेरिकनांची म्हणताना अमेरिकन असे कोणते एकक तिथे आहे? काळे-गोरे, हिस्पॅनिक्स, रेड इंडियन असे तिथेही आहेत. खेरीज जगभरातून तिथे रहिवासाला गेलेले भारतीय, चिनी, फिलिपिनो असे सगळे आहेतच. त्या सगळ्यांच्या श्रमातूनच आजच्या बलाढ्य अमेरिकेची निर्मिती झालेली आहे. आधुनिक काळात अमेरिकेत जे झाले, ते या आपल्या देशात हजारो वर्षांपासून सुरू आहे. जगातल्या यच्चयावत् वंशांची उपस्थिती आपल्या लोकांत आहे. आपल्याला अभिमान वाटावा, अशीच ती गोष्ट आहे. ते आपल्या सहिष्णुतेचे एक सुंदर दृश्य रूप आहे. या देशात राहणारे ख्रिस्ती, मुसलमान आणि इतर धर्मश्रद्धा बाळगणारे लोक आपल्याइतकेच- म्हणजे स्वतःला हिंदू म्हणविणाऱ्या लोकांइतकेच- भारतीय आहेत. कोणालाही बाहेरचे आणि परके म्हणण्याचा आपल्याला काडीचाही अधिकार नाही. तसा विचार करायचा झाला, तर या भारतीय उपखंडातील आपण अधिकांश हे बाहेरचेच लोक आहोत. इथल्या आदिवासी, कोळी, भोई आणि तत्सम लोकांवर आक्रमणे करून आपल्या बहुतेकांच्या पूर्वजांनी इथे जागा करून घेतलेली आहे. कोणी कितीही संख्येने आले, तरी त्या सगळ्यांना जगण्यासाठी भरपूर अन्न, पाणी आणि हिमालयाच्या प्राचीन बर्फावरून शुद्ध होऊन आलेली उत्तम हवा या देशात अतिप्राचीन काळापासून मुबलक राहिलेली आहे. मानवी प्रजातीच्या वाढीसाठी आणि उत्कर्षासाठी इतकी सहज उत्तम भूमी दुनियेत


Date of Publication - 9-11-2017

आणखी कुठेही नाही. साहजिकच अगदी प्राचीन काळापासून सगळ्या दिशांनी माणसांच्या टोळ्या इथे येऊन राहिलेल्या-रहिवासलेल्या आहेत. इथल्या भूमीने आणि इथे आधी आलेल्या लोकांनी विशेष खळखळ न करता नंतर आलेल्यांना सामावून घेतलेले आहे.

पण आज स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे लोटल्यानंतरही आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा महापुरुष इथे होऊन गेल्यानंतरही आपण सर्व जाती-धर्मांमधल्या दलितांना आपल्यात पुरेसे सामावून घेतलेले नाहीये. आपल्यासाठी अन्न निर्माण करून आपल्याला जगविणाऱ्या शेतकऱ्यांच्या जगण्यातली परवड वाढती आहे. त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढते आहे. देश महासत्ता होण्याच्या वल्गना करणाऱ्यांना अन्नाविना उपाशी मरणारे लक्षावधी लोक दिसत नाहीत. ते लोक कसलाही आवाज न करता निमूटपणे नाहीसे होतात. लक्षावधी लहान बालकांना दुनियेतला उजेड दिसतो न दिसतो तो इथून नाहीसे व्हावे लागते. लक्षावधी स्त्री-भ्रूणांना तर तो उजेड पाहण्याची संधीसुद्धा मिळत नाही. बाबरी मशिदीचे पतन ही आपल्या लोकांच्या धार्मिक सौहार्दावर घाला घालणारी फार दुःखद घटना आहे. तो आपल्यातल्या गंगा-जमनी वृत्तीवर झालेला फार मोठा आघात आहे. मतपेटीच्या राजकारणासाठी काही लोकांनी ते केले. त्यांनी त्या वेळी या आघाताचा विचार कसा केला नाही? आणि त्या वेळी सत्तेत असलेल्या लोकांचीही झाले त्याला मूक संमती होती की काय? धार्मिक कारण घेऊन आपल्यापासून अलग झालेल्या शेजारी देशातील राज्यकर्त्यांना तर हे फारच सोईचे झाले आहे. 'आम्ही सांगतोय ना की, हे हिंदू लोक मुसलमानांवर किती अत्याचार करतात; त्यांच्या भावना पायदळी तुडवतात, हा बघा त्याचा पुरावा!' असे म्हणण्यासाठी त्यांना आपण जागा करून दिलेली आहे. इतके सगळे होऊनही आपले आजचे वर्तमान तितके विस्कटलेले नाहीये याचे कारण आपल्यातल्या गंगा-जमनी वृत्तीचे दीर्घ संचित. परवा कोणत्या तरी एका चॅनेलवर एक चर्चा चालू होती. ते असतंच सतत. मी कधीमधी बातम्या पाहण्याची करमणूक म्हणून टीव्ही बघतो. तिथेही प्रचंड पाणी टाकून सगळे दाखवत असतात. तरीही थोडा वेळ का होईना, बघण्यासारखं तेच असतं. तर, तिथे चर्चा चालू होती अयोध्येत राममंदिर बांधण्याची. एक मुसलमान म्हणाला, 'मी बांधीन राममंदिर. मुसलमान असलो तरीही मी कुछवाहा राजपूत आहे. मी प्रभू रामचंद्राचा वंशज आहे.' आता या आपल्या एकमेकांत दीर्घ काळ सरमिसळ झालेल्या देशात कोण कोणाचा वंशज आहे, हे सांगणे मुश्कील. प्रभू रामचंद्र कुछवाहा राजपूत होता का, हाही प्रश्नच आहे. काही लोकांच्या मते, तो मुंडा जातीच्या लोकांत जन्मला होता. पण त्या मुसलमान माणसाची स्वतःला रामचंद्राशी जोडण्याची वृत्ती मला महत्त्वाची वाटते. हे आपले गंगा-जमनी संचित. राम असो व कृष्ण मुंडा असो वा गवळी- आपण त्यांना देवांच्या जागी नेले आहे. आणि आपल्या देशातील सगळ्या धर्मांच्या लोकांनी ते केले आहे. आपण यातून बळ घेतले पाहिजे. काळ कठीण आहे. सौदी अरेबियातून आलेल्या पैशाने आपल्या मुसलमानांना भडकावून वेगळे राहण्यास प्रवृत्त केले आहे. त्याचा सामना हे आपले संचित करत आहे, त्याला आपण उचलून धरले पाहिजे. मी आपल्याला आणखी एक अनुभव सांगतो. अलीमुल्लाखान वकील नावाचे माझे एक मित्र आहेत. ते माझे संगमनेर महाविद्यालयातील सहकारी. इतिहास, राजकारण, प्रशासन आणि संस्कृती यांचे एक महत्त्वाचे अभ्यासक. हल्ली ते नाशिक जिल्ह्यात चांदवड येथे राहतात. काही काळापूर्वी त्यांचे कराचीला राहणारे काही नातेवाईक महिन्याभरासाठी तिकडे आले होते. इथले वातावरण बघून ते त्यांना म्हणाले, 'आम्हाला तर खूपच वेगळ्या गोष्टी सांगण्यात आलेल्या होत्या. इथे मुसलमानांवर फार जुलूम होतोय, त्यांचे जिणे इथे हराम झाले आहे- अशा गोष्टी आम्हाला सांगण्यात आलेल्या होत्या. पण इथे तर आप लोग कितने चैन और सुकूनसे जी रहे हो. हमारे यहाँ बिलकुल अलग किस्मका माहौल है. हमारी जिंदगी किडेमकोडेके माफिक हो गयी है. यहाँ तो औरते भी- चाहे वो हिंदू हो या मुस्लिम- आरामसे कही भी स्कूटरपर घूम सकती है!'

कोणत्याही क्षणी महायुद्धाचा- आण्विक युद्धाचा भडका उडेल, अशी जगातली परिस्थिती आहे. या वर्तमानात आपले एक बहुसांस्कृतिक वास्तव म्हणून एक असणे, एकमेकांचा आदर करणे फार महत्त्वाचे आणि गरजेचे आहे.

या सगळ्यात मी मराठी साहित्य- आजचे साहित्य, महत्त्वाचे लेखन यांच्याविषयी काहीही बोललेलो नाहीय. त्याच्याविषयी बोलणे शक्य आणि आवश्यकसुद्धा आहे. पण इथे मी निर्देशित केलेले प्रश्न आणि त्यांच्यासारखे अनेक प्रश्न हे एक समाज म्हणून आपल्यासाठी खूप जिव्हाळ्याचे-अधिक महत्त्वाचे आहेत, हे आपण मान्य

कराल. मी आधी म्हणालो तसे साहित्याचे सारे प्रश्न भाषा आणि संस्कृती याच्याशी, त्यांच्या वर्तमानाशी संबंधित असतात. ते आपल्या वर्तमान जगण्याशी संबंधित असतात. एक भाषिक समाज म्हणून आपल्या भाषेच्या वर्तमानाविषयी-प्रश्नांविषयी मी इतरत्र भरपूर बोललेलो आहे. या देशाचा नागरिक म्हणून आज जे मला जिव्हाळ्याचे आणि तातडीचे वाटते, ते मी आपल्यासमोर मांडले आहे. जग प्रत्यही बदलत आहे. हे बदल फार वेगाने होत आहेत. कल्याणकारी दिशेवर एक प्रजाती म्हणून आपण माणसे ठाम राहिलो, तर आपले भवितव्य फार उज्ज्वल आहे. पण त्याला छेद देण्याची आत्मनाशाची प्रवृत्तीसुद्धा आपल्यात कमी प्रबळ नाही. एक प्राचीन आणि सहिष्णू संस्कृती म्हणून या दुनियेला आत्मनाशापासून वाचविण्याची जबाबदारी आपण पत्करली पाहिजे. आपल्या प्रदीर्घ सांस्कृतिक संचिताने ती आपल्यावर टाकलेली आहे, असे आपण मानले पाहिजे. त्यासाठी आपल्यातले विविध धर्म, पंथ, जाती या सगळ्यांनी एकमेकांविषयी सौहार्द भ्रातृभाव बाळगणे गरजेचे आहे. आपल्या नगर जिल्ह्यात श्रीगोंदा येथे शेख महंमद नावाचे श्रेष्ठ संत होऊन गेले. त्यांनी एका अभंगात म्हटले आहे, शेख महंमद अविंध हृदयी त्याच्या गोविंद. आपण नामदेव, ज्ञानेश्वर, चोखामेळा, कबीर, तुकाराम, गालीब, नरसी मेहता आणि शेख महंमद यांचे व यांच्यासारख्या विशालहृदयी माणसांचे वंशज आहोत. आपली सांस्कृतिक जनुके आपल्याला त्यांच्यातून मिळालेली आहेत. प्राचीन सातवाहन राजवंशापासून ते छत्रपती शिवाजीराजापर्यंत हे भरतखंड बांधलेले ठेवण्याची शिकवण आपल्या महाराष्ट्री लोकांत पाझरलेली आहे. तिचा अंगीकार करून आपण साऱ्या मानवी प्रजातीला आत्मनाशापासून वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. साने गुरुजी म्हणाले होते- 'बलसागर भारत होवो। विश्वात शोभूनी राहो।' बलसागर झाल्याच्या भ्रमात विश्वाला धमकावण्याच्या गोष्टी अनेक महाशक्ती आज करू लागलेल्या आहेत. त्यात गुरुजींचे हे विश्वात शोभूनी राहण्याचे स्वप्न वेगळे आहे. ते संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील 'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो। जो जे वांछील ते लाहो। प्राणिजात।' या ओळींचा वारसा सांगणारे आहे. या प्राचीन भाषा आणि संस्कृतीचे सभासद, या भरतखंडाचे विश्वस्त म्हणून जी जबाबदारी आपल्या पूर्वजांनी स्वीकारलेली होती; तिचे भान ठेवण्याची- त्याचे तातडीने पुनःजागरण करण्याची- आज गरज आहे. असा काही संकल्प या निमित्ताने आपण करू शकलो तर ते एक मोठेच काम होईल, याविषयी माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही.

आजच्या या अशा वर्तमानात लेखकांनी काय करावे, असे मी काहीही म्हणालेलो नाहीय. कारण लेखकांना कोणी आदेश द्यावा आणि त्यांनी तो तंतोतंत पाळावा, अशा मताचा मी नाहीये. आपल्या वर्तमानाला प्रतिक्रिया देण्याची प्रत्येक लेखकाची रीत वेगळी असते. त्यांच्या त्या विविध रीतींचा मी आदर करतो. त्यांच्या व्यक्त होण्याच्या स्वातंत्र्याचा मी आदर करतो. त्यांनी त्यांचे ते स्वातंत्र्य जपावे; त्यासाठी पडेल त्या त्यागाची तयारी ठेवावी, हे मात्र मी अवश्य म्हणेन. आजच्या आदेश देणाऱ्या, भय निर्माण करणाऱ्या या काळात आपल्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य टिकविणे, आपला स्वर-आपले नीतिधैर्य टिकवून प्रकट करणे फार महत्त्वाचे झालेले आहे. आणि हे मी फक्त आपल्या भाषेतील किंवा आपल्या देशातील लेखकांसंबंधी म्हणत नाहीये. दुनियेतल्या प्रमुख देशांत सारीकडे एकाच वेळी या प्रकारचे भय उत्पन्न करणाऱ्या प्रवृत्ती सत्तेत आलेल्या असण्याचा हा असाधारण काळ आहे. लेखकांच्या नीतिधैर्याची कसोटी पाहणारा हा काळ आहे. आपले आंतरिक स्वातंत्र्य प्राणपणाने जपण्याचा काळ आहे. ते ते किती आणि कसे जपतात, यावर येणाऱ्या दुनियेचे भवितव्य अवलंबून आहे. असे स्वातंत्र्य जपणे हे अनेक प्रकारची जोखीम पत्करतच शक्य असते. ते पत्करण्याचे बळ आपल्या भाषेतल्या आणि दुनियेतल्या सगळ्या भाषांमधल्या लेखकांना या ना त्या प्रकारे प्राप्त होवो, अशी शुभेच्छा व्यक्त करून मी थांबतो. धन्यवाद.

**रंगनाथ पठारे**

(महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने अहमदनगर येथे झालेल्या विभागीय साहित्य संमेलनात ४ नोव्हेंबर २०१७ रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.)


Date of Publication - 9-11-2017

# प्रतिसाद

## तसे करण्याने वाद वाढतात आणि ग्रंथशरणताही!

नऊ सप्टेंबरच्या अंकातील तिहेरी तलाकवरचे संपादकीय (शाहबानो ते शायराबानो) जास्त करून सुधारणावादी दृष्टिकोनातून आणि राजकारणाच्या दृष्टिकोनातून लिहिले आहे, असे वाटते. त्यात कायद्याची उकल कमी आहे.

सुप्रीम कोर्टाचा निर्णय फक्त एका न्यायाधीशाच्या मताधिक्याने दिला गेला आहे. या एका निर्णायक मताने वीस कोटी लोकांच्या जीवनपद्धतीवर परिणाम होणार आहे. तेव्हा, आणि या प्रश्नावर कायदेपंडितांतच मतभेद आहेत, हे लक्षात घेऊन कायद्याच्या दृष्टिकोनातून काय वेगळे मत आहे, तेही पाहणे आवश्यक आहे.

कोर्टाचे काम फक्त शासकीय कायद्यांचे अर्थ लावून त्याप्रमाणे वाद सोडवण्याचे असते. धार्मिक कायदे हे कोर्टाच्या दृष्टीने मुळी कायदेच नसतात, प्रथा असतात– असे हरीश खरे या कायदेपंडिताने एकदा म्हटले आहे. पण त्या संबंधातले वाद कोर्टासमोर येतात आणि ते सोडवताना कोर्टे धर्मपंडितांची मते प्रमाण मानतात, अशी परंपरा आहे. हिंदू कायद्यात ज्या वेळी शासकीय कायद्यांद्वारे सुधारणा झाल्या नव्हत्या, तेव्हा पारंपरिक कायदा काय आहे, हे ठरवताना न्यायालये भारतरत्न पां.वा. काणे यांचा धर्मशास्त्रावरील ग्रंथ प्रमाण मानत असत. मुसलमानी कायद्यांचे अर्थ लावताना मुसलमानी धर्मपंडितांनी लावलेला अर्थ प्रमाण मानण्याची पद्धत आहे.

सर्व धार्मिक प्रथांकडे दुर्लक्ष करून सर्वस्वी आधुनिक मूल्यांवर आधारलेला नागरी कायदा– ज्यात हिंदूंचे कायदेसुद्धा बदलावे लागतील, असा कायदा– जोपर्यंत अस्तित्वात येत नाही, तोपर्यंत प्रत्येक पंथांचे पारंपरिक कायदे व प्रथा चालू राहतील, असाच आपल्या राज्यघटनेचा अर्थ आहे. आदिवासी आणि वनवासी समाजघटकांच्या प्रथासुद्धा चालू राहतील. भूतपूर्व लॉ कमिशन सदस्य ताहिर महमूद यांनी एका वेगळ्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे भारतीय राज्यघटना ही अंशत:च धर्मनिरपेक्ष आहे, पूर्णत: नव्हे. (Ind. Exp. 13-9-17) आपली राज्यघटनाच मुळी तडजोडीतून तयार झालेला दस्तावेज आहे. राजकारण असे तडजोडीनेच चालत असते आणि अशा राजकारणाला जनप्रतिनिधींचा पाठिंबा मिळत असतो. जनप्रतिनिधींच्या पाठिंब्याने चालणाऱ्या या राजकारणाला उलट दिशा देणे, हे चार-पाच न्यायाधीशांच्या पीठाच्या अधिकारात बसत नाही.

तसा उलट दिशा देण्याचा प्रयत्न शाहबानो प्रकरणात सुप्रीम कोर्टाने केला होता. त्यात कोर्टाने शरीयतचा अर्थ लावण्याची एक कसरत केली होती. ती टाइम्स ऑफ इंडियाच्या मते Tortuous (अगम्य पद्धतीने केलेली) होती. घटनाकारांनी घटना तयार करताना जी तडजोड स्वीकारली होती, तिच्याविरुद्ध हा निर्णय जात असल्याने तेव्हाच्या सरकारने संसदेच्या बहुसंख्य सभासदांच्या संमतीने सुप्रीम कोर्टाचा निर्णय फिरवला. संसदेच्या त्या कृतीला कोणीही– कोर्टानेसुद्धा बेकायदेशीर म्हटलेले नाही.

तिहेरी तलाकबाबतच्या सध्याच्या न्यायालयीन निर्णयाने कायदे करण्याच्या व राबवण्याच्या प्रक्रियेत एक गोंधळ निर्माण झाला आहे. एखाद्या पुरुषाने पत्नीला त्रिवार तलाक म्हटले, तर त्या पत्नीच्या विवाहिततेवर काय परिणाम होईल? न्यायलयाच्या दृष्टीने ती पत्नी राहील, पण तिच्या कुटुंबाला आणि समाजाला ते मान्य असेल का? तिचा नवरा आणखी एक लग्न करायला केव्हाही मोकळाच असतो, तिला मात्र दुसरे लग्न करता येणार नाही. मग ती जाणार कुठे? आजच्या घटकेला तरी मुसलमान समाज राज्यघटनेने त्यांना दिलेला स्वतंत्र कुटुंबकायदा राखण्याचा अधिकार सोडायला तयार नाही. तेव्हा सरकारही काहीसे हतबलच आहे. ‘संसदेने कायदा करावा’ असे कोर्टाने म्हटले आहे खरे; पण मुसलमानांच्या कौटुंबिक कायद्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार संविधानाने संसदेला दिला आहे की नाही, हाच तर मुळात प्रश्न आहे. संविधानातल्या काही तरतुदी पायाभूत स्वरूपाच्या आहेत आणि त्या बदलण्याचा अधिकार संसदेला नाही, असे सुप्रीम कोर्टाचे म्हणणे आहे. काही तरतुदी सुप्रीम कोर्टाला अपरिवर्तनीय वाटतात,; तर इतर काही


Date of Publication - 9-11-2017




तरतुदीसुद्धा अपरिवर्तनीय आहेत, असे राजकारण्यांना वाटू शकत नाही का?

अशी ही कायद्याची गुंतागुंत आहे. मूळ संविधानाने स्वीकारलेली तडजोड बहुमताच्या किंवा न्यायालयीन युक्तिवादाच्या जोरावर मोडून काढणे योग्य होणार नाही. सामाजिक सुधारणा हा राजकारणाच्या बाहेरचा विषय असायला पाहिजे, म्हणजे आधी समाजातले बहुमत सुधारणांच्या बाजूचे झाले पाहिजे. समाजाला मानवतील इतक्याच प्रमाणात कायद्यात सुधारणा झाल्या पाहिजेत. हिंदू कायद्यात ज्या सुधारणा झाल्या आहेत, त्या अशा पद्धतीने झाल्या आहेत. हिंदू समाजात अजूनही सुधारणा हव्या आहेत, पण हिंदू श्रद्धांना धक्का देणाऱ्या लोकांना गोळ्या मारल्या जाताहेत; आणि मुसलमानांबद्दल मात्र असा आग्रह धरला जात आहे की, त्यांनी 'हिंदूंची जीवनमूल्ये तत्त्वत: आणि व्यवहारत: स्वीकारली पाहिजेत.' (हे शब्द वरिष्ठ संघनेते मा. गो. वैद्य यांनी मला लिहिलेल्या पत्रातले आहेत.) हे वातावरण मुसलमानी समाजसुधारणेला नक्कीच पोषक नाही.

मुसलमानी समाजाची सुधारणा त्याच समाजाने स्वत:च्या इच्छेने करायला हवी. इतरांनी त्यांच्यावर दबाव आणला, तर परिणाम उलटाच होईल. इतर लोक बंधुत्वाच्या नात्याने फक्त सल्ला देऊ शकतात. मी स्वत: दोन मुसलमान कार्यकर्त्यांशी पत्रव्यवहार करून असे सुचवले आहे की, त्यांनी मुसलमानांचे प्रबोधन करताना कुराणाच्या शब्दांचा कीस काढत बसू नये. तसे करण्याने वादही वाढतात आणि ग्रंथशरणताही वाढते. त्यांनी आदर्श जीवनाच्या कल्पनेवर भर द्यावा. Nevil Shute लिखित Round the Bend या कादंबरीत असेच एक आदर्श पात्र उभे केले आहे. कथानायक मध्य-पूर्वेतला एक मुसलमान कामगार असतो. तो आपले काम चोख करण्याकडे जास्त लक्ष देतो. पाचदा नमाज पढणे त्याला जमत नाही. पण काम संपल्यावर इतर सवंगड्यांबरोबर भक्तिभावाने नमाज पढतो. त्याच्या प्रामाणिकपणाची व साधेपणाची छाप त्याच्या सवंगड्यांवर पडते आणि ते त्यालाच आपला गुरू मानायला लागतात. मुसलमान समाजात असेच काही तरी व्हायला पाहिजे.

तिहेरी तलाकचा प्रश्न सोडवण्याकरता सरकारने स्वत: काही कायदा करण्यापेक्षा Muslim Personal Law Board ला काही न्यायिक अधिकार देऊन अन्याय कमी करण्यास प्रवृत्त करावे.

**भ. पां. पाटणकर,** नागपूर, Mob. : 9168801575


Date of Publication - 9-11-2017

# SkinSense
## Skin & Laser Clinic

Using science to enhance youth and delay ageing.

At SkinSense we use the latest and safest technological advances in the field of cosmetic dermatology to offer customized solutions for your aesthetic needs.



**Dr. Abhijit Desai**
Cosmetic Dermatologist and Laser Specialist



**Dr. Gauri Desai**
MD, Laser Specialist

- Botox
- Dermal Fillers
- Permanent Laser Hair Reduction
- Laser Treatment for Acne Scars
- Laser Peel for Pigmentation
- Laser Peel for Skin Rejuvenation
- Acne Treatment
- Laser Treatment for warts and skin tags

**NEW**

- 4D Laser Skin Tightening and non-surgical Face Lift
- Snorelase – Non-surgical Treatment for Snoring
- Intimalase – Non-surgical Vaginal Tightening

**Address:**
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai – 400028

**Tel no.:**
02224331099 / +919920977940

**Email:**
dr.skinsense@gmail.com

**Website:**
www.yourskinsense.com

Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ / रजि.क्र. पी.सी.डब्ल्यू./०८०/२०१५-१७
Posted at PUNE PSO / Date of Posting : 09-11-2017 / Date of Publication : 09-11-2017


# साधना प्रकाशनाची दोन नवी पुस्तके




## चले जाव

**पृष्ठे ७२ । किंमत ६० रुपये**

८ ऑगस्ट १९४२ च्या त्या ऐतिहासिक सभेत चौघांची भाषणे झाली होती.
त्यावेळी काँग्रेसच्या अध्यक्षपदावर मौलाना अबुल कलाम आझाद होते,
त्यामुळे त्यांचे भाषण सर्वप्रथम झाले. नंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी
काँग्रेस कार्यकारिणीचा ठराव सभेपुढे वाचून दाखवला आणि
ठरावाचे समर्थन करणारे भाषण केले. त्यानंतर त्या ठरावाला अनुमोदन देणारे
भाषण सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले. आणि मग महात्मा गांधी यांनी,
'हा ठराव सभेने मंजूर करावा' असे आवाहन करणारे प्रास्ताविक भाषण केले.
ठरावाला उपस्थित प्रतिनिधींची मंजुरी मिळाल्यानंतर गांधीजींनी लढ्यामागची
कारणमीमांसा आणि पुढची दिशा यांवर हिंदीतून मुख्य भाषण केले.
आणि समारोपाचे भाषण इंग्रजीतून केले. ही तिन्ही भाषणे मिळून
गांधीजी जवळपास सव्वादोन तास त्या सभेत बोलले.
सायंकाळी ६ वाजता सुरू झालेली ती सभा रात्री १० पर्यंत चालली होती.




## विज्ञान आणि समाज

**पृष्ठे १०८ । किंमत १०० रुपये**

या पुस्तकात पाच मान्यवरांचे लेख आहेत.
डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर,
सर्वसामान्य सुशिक्षित वर्ग समोर ठेवून केलेली दोन भाषणे आहेत.
त्यातून सैद्धांतिक मांडणीपेक्षा विषयाची ओळख करून देण्याला महत्त्व दिलेले आहे.
सुबोध जावडेकर यांनी 'विज्ञान व भ्रामक विज्ञान' हा विषय सैद्धांतिक स्वरूपात
पण सर्वसामान्य लोकांना वाचायला सुबोध अशा पद्धतीने मांडला आहे.
प्राचीन भारतातील विज्ञानाच्या प्रगतीसंदर्भात केलेल्या दाव्यांची
तपासणी करणारा लेख मयंक वाहिया यांनी लिहिला आहे.
तर विवेक सावंत यांचा लेख विज्ञान व समाजजीवन
आणि माणूस व यंत्र यांच्यातील नात्यांचा नव्याने विचार करायला प्रवृत्त करतो.
आणि जॉर्ज ऑरवेल यांचा लेख आधीच्या चौघांना जोडणारा आहे.

**संपर्क : साधना प्रकाशन** sadhana.prakashan@gmail.com
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन 020 24459635